
# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :
**श्री. क. हि. काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
**डॉ. श्री. दि. परचुरे** एम. ए. पी. एच. डी. (इंग्रजी आवृत्ती)
**श्री. सदानंद चेंदवणकर** (मराठी आवृत्ती)


**श्रीसाई वाक्सुधा**


**वर्ष ६० वे) किंमत १ रुपया (अंक ११**

**फेब्रुवारी १९८२**


**श्रीसाई काव्यबहार विशेषांक**


: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

मन साईपदीं अर्पण ।
जाहलें याची एकच खूण ।
साधक होय शांति प्रवण ।
उल्हासे संपूर्ण निजभक्ति ॥ १३ ॥

सप्रेम गुरुभक्ति या नाव धर्म ।
अवघा तो मीच हे 'ज्ञानवर्म' ।
विषयीं अरति 'वैराग्य' परम ।
संसारा 'उपरम' ते ठायीं ॥ १४ ॥

ऐसिया भक्तीचा महिमा धन्य ।
केलिया जीवेंभावे अनन्य ।
शांति विरक्ती कीर्ति या तीन ।
जियेच्या आधीन सर्वदा ॥ १५ ॥

गुरुभक्ति ऐसी जयासी ।
उणें कैंचे तरी तयासी ।
इच्छील जें जें आपुले मानसीं ।
तें तें अप्रयासी लाघेल ॥ १६ ॥

ऐसिया त्या भक्तीपासीं ।
ब्रम्हस्थिति तों आंदणी दासी ।
तेथें कोणी न मोक्षा पुसी ।
तीर्थें पायांसी लागती ॥ १७ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४६ वा.

## सुस्वागतम

श्रीसाईलीलाच्या
आठव्या
लेखक—कवी
स्नेहसंमेलन प्रसंगी
आम्ही सर्व लेखक कवी
हितचिंतक या
सर्वांचे हार्दीक
स्वागत करीत
आहोत.

—संपादक

37

# श्रीसाईनाथ अवनी अवतरले भक्त कल्याणार्थ





किती मनोहर मूर्ति साईची आनंद वाटे मना ।
जणू अवतरले साई दत्त राणा ॥
ब्रह्मांड व्यापका त्रैमूर्ति तू साईदत्त देवा ।
कृपा करूनी दुःख संकटातूनी भक्तां सुखी ठेवा ॥

# श्री साईलीला काव्यबहार अंकाचे मानकरी
## फेब्रुवारी १९८२


१) संपादकीय
२) श्री. नानासाहेब रासने– श्री. क. हि. काकरे
३) सद्गुरु नानासाहेब-सदानंद चेंदवणकर
४) प. पू. श्री स्वामी संजयानंद
५) प्रा. र. श्री. पुजारी
६) डॉ. विनायक गो. दुर्गे
७) डॉ. उमेश ल. केळकर
८) डॉ. सौ. सुमती खानविलकर
९) डॉ. आर. एस. कापडी
१०) डॉ. सौ. मालती रहाटे
११) डॉ. ग. स. कामत
१२) डॉ. इंदूताई नाईक
१३) डॉ. वसंत पात्रीकर
१४) सौ. तारा चेंदवणकर
१५) प्रो. एच. बी. महाले
१६) श्री. रमाकांत पंडित
१७) सौ. प्रभाताई मुळये
१८) श्री. प्रभाकर कोळमकर
१९) सौ. संपदा नारगोळकर
२०) श्री. डी. बी. पोतनीस
२१) सौ. अस्मिता दांडेकर
२२) श्री. जगदीश देवपुरकर
२३) सौ. उषाताई मुळे
२४) श्री. नरसिंहराजा देशपांडे
२५) सौ. शशिकला रेवणकर
२६) श्री. आकरेकर गुरुजी
२७) सौ. लीलाताई मराठे
२८) श्री. विजय हजारे
२९) सौ. चंद्राबेन भाटे
३०) श्री. अनिल रसाळ
३१) सौ. शकुंतला जगतकर
३२) प्रा. गुंडेराव पटवारी
३३) श्रीमती लीलाताई गुजराथी
३४) श्री. ग. रा. पालकर
३५) श्रीमती श्री शहाणे
३६) श्री. सूर्यकांत गर्जे
३७) कु. शशिकला साळगावकर
३८) श्री. र. शं. जुन्नरकर
३९) श्री. नागेश मोगलाईकर
४०) श्री. रमेश चव्हाण
४१) श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
४२) सौ. शारदा वाकनीस
४३) श्री. दत्तात्रय मोरे
४४) सौ. वसुंधरा चोरे
४५) श्री. दा. र. दळवी
४६) सौ. संपदा पावसकर
४७) श्री. रा. मा. आडकर
४८) सौ. सिंधू सणस
४९) श्री. ग. दे. कुलकर्णी
५०) सौ. उषाताई अधिकारी
५१) श्री. बी. व्ही. लांजेकर
५२) श्री. एन. जी. परुळेकर
५३) सौ. कलावती चव्हाण
५४) श्री. शंकरराव गोलतकर
५५) श्री. उज्ज्वल कुलकर्णी
५६) कु. रेखा दिघे

स. न. वि. वि.-

# श्रीसाईलीलाचे आठवे लेखक-कवी संमेलन




श्रीसाईलीला मासिकाचा हा काव्य बहार विशेषांक, साईभक्त वाचकाच्या रसिक कवींच्या-कवयत्रींच्या हाती देण्यात आज विशेष आनंद होत आहे. विशेषतः श्रीसाईलीला मासिकाच्या आठव्या लेखक-कवी स्नेहसंमेलन प्रसंगी तो अध्यक्षांच्या शुभहस्ते आपल्या हाती देत आहोत याबद्दल एक आगळाच आनंद आम्हाला वाटत आहे. या संमेलनाचे अध्यक्ष महोदय श्री. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने हे श्रीबाबांच्या कृपाप्रसादाने जन्मलेले आहेत व साक्षात् बाबांचे त्यांनी अनेकदा दर्शन घेतलेले आहे व आजही साईसंस्थानमध्ये ते सुरळीत कारभारासाठी सल्ला देत असतात. रथसप्तमी आणि तिळगूळ समारंभ प्रसंगी हा अंक आपल्या हाती देत आहोत. तो गोड करून घ्यावा अशी आमची आपणाला विनंती आहे.


भक्तांनो, आपण जर हा अंक नुसता वरवर जरी चाळलात तर अनेक सुविद्य अशा साईप्रेमी भक्तांचे स्वरचित असे काव्य या अंकात समाविष्ट करण्यात आले आहे. हे साहित्य मिळविण्यासाठी आम्हाला किती कष्ट पडले असतील याची कदाचित आपणाला कल्पना नसेल व ती येता पण कामा नये. पण आपण सर्वांनी हा अंक पाहून निदान समाधानाचा जरी सुस्कारा सोडलात तरी आमचे कष्ट, श्रम, मेहनत सारे काही क्षणभरात दूर झाल्यासारखे आहे.

मित्रांनो, आज हे आपले आठवे स्नेहसंमेलन भरत आहे. श्रीसाईलीलामधून लेखन-काव्य करणारी विविध पेशातील दूरदूरची लेखक-कवी भक्तमंडळी दोन दिवस एकत्र येतात, आचारविचारांचे दोन दिवस आदान-प्रदान करतात; व त्याचा उपभोग विविधांगी असा होत असतो असे आढळून आले आहे. साईबाबांवर कितीतरी पुस्तके कादंबऱ्या, दिवाळी अंक, कॅसेटस आली हा याबद्दलचा दाखला देता येईल. संमेलनामुळे साहित्याच्या दृष्टीकोनातून साई प्रचार कसा होत आहे हे यावरून दिसून येते. शिवाय प्रत्यक्ष लेखन करणाऱ्या मंडळींना अतिशय जवळून पहाता येते हाही या संमेलनामुळे फार मोठा फायदा झाला आहे. प्रती वर्षाप्रमाणे हे संमेलनही यशस्वी पार पडो अशी शुभकामना श्रीसाईचरणांपाशी व्यक्त करतो.

जय श्रीसाईराम

# श्रीसाईलीला ८ व्या लेखक–कवी संमेलनाचे अध्यक्ष परमसाईभक्त श्री. नानासाहेब रासने

—श्री. क. हि. काकरे
मुख्य संपादक श्रीसाईलीला
न्यायालयधारक श्रीसाईबाबा संस्थान शिरडी



● श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे मुखपत्र श्री साईलीला ( मराठी, हिंदी, इंग्रजी ) मासिकाच्या लेखक व कवींचे आठवे वार्षिक स्नेहसंमेलन सालाबादप्रमाणे ह्या वर्षीही दि. ३१–१–८२ रविवार व दि. १–२–८२ सोमवार रोजी शिरडी येथे मोठ्या आनंदाच्या वातावरणात भरविण्यात येत आहे. आतापर्यंतचा प्रघात असा आहे की, श्री साईलीला मासिकाच्या लेखक व कवि संमेलनाचे अध्यक्षपद अशा व्यक्तिला दिले जाते की ज्याने श्री साईबाबांना त्यांच्या हयातीत पाहिलेले आहे व त्यांचा निकटचा सहवास लाभलेला आहे. ह्या प्रथेला अनुसरूनच ह्या स्नेहसंमेलनाचे अध्यक्षपद स्विकारण्यास पुण्याचे श्री. रा. रा. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने ह्यांना विनंती करण्यात आली व ती त्यांनी कुठलेही आढेवेढे न घेता मान्य केली.

श्री. नानासाहेब रासने ह्यांचे मूळ घराणे अहमदनगर येथील आहे. त्यांचे आईवडिल; व सर्व घराणे निस्सिम साईभक्त होते व आहे. श्री. नानासाहेब रासने हे सुद्धा एक निस्सीम साईभक्त आहेत. श्री. नानासाहेब रासनेंचा जन्मच मुळी श्रीसाईबाबांच्या आशिर्वादाने झालेला आहे. त्यांच्या आईवडिलांना संतती नव्हती आणि त्यामुळे ते कष्टी होते. श्री साईबाबांनी त्यांच्यावर कृपाकरून त्यांना चार आम्र फळे दिली आणि ह्या देणगीचे ज्येष्ट फळ श्री. नानासाहेब रासने हे आहेत. ह्या त्यांच्या न्माची हकिकत श्री. दाभोलकर उर्फ हेमाडपंतकृत मराठी श्रीसाईसच्चरित्र ह्या ग्रंथाच्या २५ व्या अध्यायात आहे.

श्री. नानासाहेबांचा जन्म सन १९०० साली शके १८२२ च्या दत्तजयंतीचे दिवशी अहमदनगर येथे झाला. दत्तजयंतीच्या दिवशी त्यांचा जन्म झाला असल्याने

त्यांचे नाव दत्तात्रय असे ठेवण्यात आले आहे. श्री. नानासाहेब त्यांच्या बाळपणापासूनच श्री साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. त्यांचे वडिल श्रीं. दामुअण्णा कासार हे अहमदनगरचे भांड्याचे प्रसिद्ध व्यापारी होते. त्यांचा भांड्याचा फार मोठा व्यापार होता. एवढा मोठा व्यापार घरी असतानाही श्री. नानासाहेब त्यात रमले नाहीत. ते साईसेवेतच तल्लीन झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण शिरडी येथे झाले. मराठी सहावी पलिकडे त्यांनी शिक्षण घेतले नाही.

सन १९१८ साली वैशाख महिन्यात नानासाहेबांचे लग्न कु. सुंदराबाई भांगले ह्यांच्याशी मोठ्या थाटामाटात पंढरपूर येथे पार पडले. पुढे काही महिन्यांनी आश्विन शुद्ध दशमी दसऱ्याच्या दिवशी श्री साईबाबांनी आपला देह ठेवून आपली जीवनयात्रा संपविली व ते समाधिस्थ झाले. श्री. नानासाहेबांना तीन मुले व तीन मुली असून त्यांचेसह ७ भावांचा परिवार त्यांचे नातू पणतू मिळून जवळ जवळ ९२ माणसांचा आहे. घराण्यातील सर्वच डॉक्टर, इंजिनियर, आर्किटेक्ट इ. अशा मोठमोठ्या हुद्यावरती आहेत.

इ. सन १९२२ साली शिरडी साईबाबा संस्थानचा पब्लिक ट्रस्ट रजिस्टर झाला आणि संस्थान स्थापन झाले. त्यावेळचे कमिटी मेंबर सर्वश्री तात्या बाबा कोते, पुरंदरे, सखाराम बळवंत धुमाळ, डॉ. के. बी. गव्हाणकर, बॅ. गोविंद काशिनाथ गाडगीळ, श्रीपाद बाळकृष्ण देव, प्रधान, वसंत नारायण गोरक्षकर, डॉ. गजानन दाभोलकर, नागेश आत्माराम सावंत, इ. च्या हाताखाली सन १९३३ पर्यंत त्यांनी काम केले. सन १९३८ साली श्री. नानासाहेब रासने ह्यांची श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापक कमिटीवर निवड झाली. सहा वर्षेपर्यंत त्या कमिटीत त्यांनी जॉ. सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. तसेच ह्या संस्थानचे दुय्यम सेक्रेटरी म्हणून त्यांनी बरीचशी खाती सांभाळली. संस्थानच्या उत्सवात वेगवेगळया प्रकारच्या भूमिका केल्या. हे सर्व करीत असताना त्यांनी कधीही आणि कुठल्याही फायद्याची अपेक्षा केली नाही. ते कुठल्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत. श्रीसाईबाबांची सेवा करणे हेच ध्येय त्यांच्या डोळ्यापुढे होते. त्यांचा जन्म श्रीसाईबाबांच्या आशिर्वादामुळेच झालेला आहे ह्याचा त्यांना कधीही विसर पडलेला नाही. सन १९४७ ते १९६० ह्या काळात श्रीसाईबाबा संस्थानच्या कमिटीतील ते एक विश्वस्त होते. श्री. यशवंतराव गाळवणकर यांच्या जागी ते विश्वस्तपदी निवडले गेले.

सन १९६० साली महाराष्ट्र राज्याचे धर्मादाय आयुक्त ह्यांनी श्री साईबाबा संस्थानच्या विश्वस्तांवर दिवाणी कोर्टात दावा लावला आणि ह्या दिवाणी दाव्यात

कोर्टाने श्री साईबाबा संस्थानच्या जंगम व स्थावर मिळकतीवर रिसिव्हर नेमला आणि तेव्हापासून संस्थानचा सर्व कारभार कोर्टाने नेमलेल्या रिसिव्हर मार्फत चालत आलेला आहे. रिसिव्हर नेमल्यानंतर सुद्धा श्री नानासाहेब स्वयंस्फुर्तीने वेळोवेळी रिसिव्हरांना सल्ला देत राहिले. आजही संस्थानच्या उन्नतीसाठी त्यांची धडपड चालूच असते. त्यांच्या ह्या कार्याचा गौरव त्यावेळचे धर्मादाय आयुक्त श्री. चंद्रकांतराव गोडसे ह्यांनी केलेला आहे, आणि त्यांना त्यांनी रिसिव्हरांना कारभारात वेळोवेळी सल्ला देण्यास सांगितले होते. आजही हे त्यांचे कार्य अविरतपणे चालूच आहे.

संस्थानच्या हिताबरोबरच संस्थानच्या कामगारांचे हित सुद्धा ते डोळ्याआड करीत नाहीत. कामगारांच्या मागण्यांबद्दल संस्थानच्या रिसिव्हरांकडे ते शिफारस करतात.

गेल्या दत्तजयंतीच्या दिवशी श्री. नानासाहेबांच्या वयाला ८१ वर्षे पूर्ण झाली, व त्यांनी ८२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. उतारवय, दम्याचा विकार, अशक्तपणा ह्या सगळ्या गोष्टी असल्यातरी त्यांना एके ठिकाणी बसून चैन पडत नाही. संस्थानभर त्यांची भ्रमंती चालूच असते आणि संस्थानच्या रिसिव्हरांना वेळोवेळी सूचना देण्याचे कामही चालूच असते. कुणी श्री साईबाबांचे नावावर बुवाबाजी करू लागला तर त्यांचा त्यांना मनस्वी संताप येतो. त्यांनी श्री साईबाबांचे कित्येक चमत्कार प्रत्यक्ष पाहिलेले व अनुभविलेले आहेत. असे हे श्री. नानासाहेब श्री साईलील मासिकाच्या ह्या आठव्या स्नेहसंमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभले हे फार योग्य झाले आणि त्यामुळे ह्या संमेलनाला सार्थताही लाभली.

## प. पू. श्री. राधाकृष्ण स्वामींवर मराठीतून ग्रंथ

● ऑलइंडिया श्रीसाईसमाजाचे दिवंगत अध्यक्ष व दक्षिण भारतातील ख्यातनाम साई सेवक व बंगलोरच्या श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरचे संस्थापक श्री. राधाकृष्ण स्वामी उर्फ श्रीसाईपादानंद यांचेवर मद्रासचे श्री. पार्थसारथी यांनी लिहिलेल्या इंग्रजी ग्रंथाचा सुंदर सचित्र मराठी अनुवाद लौकरच प्रसिद्ध होत आहे. हा अनुवाद श्रीसाईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी केला असून सेंटरच्या अधिकारी मंडळींनी केलेल्या विनंती वरून हे कार्य हाती घेण्यात आले आहे.

# सद्‌गुरु श्री. नानासाहेबांच्या सहवासात


—श्री. सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

● शिरडीच्या समाधी मंदिरात आरत्यांच्या वेळी सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने मदत करणारी एक वयोवृद्ध खादी वेषधारी व्यक्ती हमेशा भक्तमंडळींना दिसून येते. वयाची ऐंशी वर्षे उलटलेली ही व्यक्ती देहयष्टीने अगदी शिडशिडीत जरी असली तरी बोलण्यात व वागण्यात अगदी अजुनही ताठ आहे. अनेक भक्तांना या व्यक्ती-बद्दल आपुलकी व कुतुहल वाटत असते. ही व्यक्ती आहे श्री. दत्तात्रय दामोदर रासने. परिश्चित मंडळी त्यांना नेहमीच नानासाहेब या नावाने पुकारतात' श्रीसाई-बाबांच्याबद्दल मनात अत्यादर व अपरंपार श्रद्धा ठेऊन आज ही व्यक्ती साईबाबांच्या शिरडीत वावरत असते.

रासने मंडळी ही मूळ अहमदनगरची, पण आता त्यापैकी काहीची फाटाफूट झाली आणि हे नानासाहेब पुण्याला गेले. पुण्याला स्थायिक होऊन उद्योग व्यवसाय करून त्यांनी शिवाजी नगरला रासने प्लॉटमध्ये एक छानसे साईमंदिर उभारले आहे. आपल्या परमदैवताबद्दलची श्रद्धा आणि प्रचार नानांनी आपल्या हयातीत केला ही मोठ्या कौतुकाची गोष्ट आहे. नानांच्या वडिलांचे नाव दामोदर व आईचे जानकी-बाई. दामोदरपंत उर्फ दामुअण्णा यांनी बाबांची प्रत्यक्ष सेवा केली आहे. दामुअण्णांचे नगरला तांब्यापितळेच्या भांड्याचे दुकान होते त्याचप्रमाणे बांगड्यांचाही ठोकबंद व्यवहार ते करीत. दामुअण्णांनी आपल्या पहिल्या मुलाला—नानांना—बाबांच्या मांडीवर आणून बसविले त्यावेळी त्यांचे वय अवघे सवावर्षाचे होते. तेव्हापासून नानांना बाबांच्याबद्दल जो जिव्हाळा, प्रेम व भक्ती वाटत आहे ती अगदी आजतागायत. नानांचे शिक्षण नगरच्या म्युनिसिपालटीच्या शाळेत व पुढील शिक्षण पुण्याच्या नूतन मराठीत झाले. सहावीपर्यंतचे शिक्षण झाल्यावर नाना आपल्या वडिलांना धंदयात मदत करू लागले. दुकानावर बसू लागले. २० जानेवारी १९४१ रोजी वयाच्य ८९ व्या वर्षी नानांचे वडील कालवश झाले. परंतु जाताना त्यांनी नानांनाच काय पण आपल्या सर्व मुलांना श्रीबाबांची भक्ती मनापासून करा असा उपदेश केला तो मात्र त्या सर्वांनी अगदी तंतोतंत पाळला. यामुळे नानांच्या उर्वरित आयुष्याचे अगदी भले झाले आहे. श्री. नानांनी आपल्या उभ्या आयुष्यात श्री बाबांच्या सहवासातल्या

तसेच त्यांच्या सहवासानंतरच्या असंख्य भक्तांना पाहिलेले आहे व त्या त्या व्यक्ती बद्दलच्या त्यांच्या स्मृती अगदी चांगल्या आहेत. यामुळे नानांशी बोलताना खरोखरच मोठा आनंद वाटतो, बाबांच्या वेळच्या कितीतरी गोष्टींची माहिती मिळते. शिरडीत झालेल्या बदलाचे त्यांचे वर्णन तर नुसते ऐकतच रहावे असे वाटते. श्री बाबांच्या वेळेपासूनचे नानासाहेब आज आपल्याला अध्यक्ष लाभत आहेत याबद्दल आनंद व्यक्त करून त्यांचे स्वागत करतो.

## श्रीसाईभक्त माधवराव भिडे यांचे देहावसान



श्रीसाईलीलेचे एक लेखक आणि कवी श्री. महादेव दत्तात्रेय ऊर्फ माधवराव भिडे (वय ७२) शनिवार दि. २८–११–१९८१ रोजी पुणे मुक्कामी श्रीसाईचरणी विलीन झाले हे कळविण्यास दुःख होते. श्री. भिडे अखेर पर्यंत श्रीसाई चिंतनात, मननात आणि श्रीसाईविषयीच्या लेखनात निमग्न होते. १९८० आणि १९८१ च्या श्रीसाईलीला संमेलनास उपस्थित राहून संमेलनात त्यानी भागही घेतला. किरकोळ आजाराचे निमित्त होऊन श्रीसाईचिंतनात असतानाच अत्यंत शांतपणे त्यांचे देहावसान झाले. त्यांचा एक लेख आम्ही गत अंकात छापला होता.

**श्रीसाई मृतात्म्यास सद्गती देवो ही प्रार्थना**

# साईबाबांची उदी

[ श्रीस्वामी संजयानंद व त्यांच्या सुशील पत्नी सौ. मीरा संजयानंद श्रीबाबांची आठवण झाली व त्यांचे डोळे भरून दर्शन घ्यावेसे वाटले की हिमालयातील बद्रीनाथहून लगोलग शिरडीस येऊन बाबांच्या सहवासात राहून परत जाताना काव्यरचना करतात. त्यांचा जन्म कोकणातला. महाराष्ट्रीय असूनसुद्धा हिमालय प्रदेशात जप-तप व योग साधना यामध्ये ते दंग, काव्य लेखनाची त्यांना भारी आवड. हिंदी मराठीतून श्री बाबांच्या विषयीच्या कविता प्रसिद्ध. अनेक रोग व व्याधींवर विविध जडी बुटींचा उपयोग याचेही त्यांना ज्ञान. मीराताई या पण उत्तम गातात. ]

उदी, उदी, उदी साईबाबांची उदी
उदी करते शुद्धी, उदी देते बुद्धी
जन्म मरणाच्या चक्रातून सोडविते ही उदी
महारोग मिटविते उदी रामबाण ही उदी
शक्तिवर्धक, मुक्तिदायक बाबांची उदी
उठता बसता सांज सकाळी प्राशन करता उदी
षड्रिपू विकार दूर करते ही उदी ॥ १ ॥

संत महात्मा योगी साधू रमती लावून उदी
नर नारी बालक वृद्ध यांची आवडती उदी
मरणाअंती शेवट होतो, होते सर्व उदी
प्राशन करता करता चढे साईनामाची धुंदी ॥ २ ॥

आल्या गेल्या दुःखी जनांना साई देत असे उदी
सांगती सर्वां फकिरा जवळ फक्त आहे उदी
उदी उदी उदी सारे विश्व हे उदी
दास संजय महिमा गात असे खाऊनी बाबांची उदी ॥ ३ ॥

—श्री. स्वामी संजयानंद,
बद्रीनाथ, हिमालय

# फळ ये ऐसे तपा !

[ सदा हसतमुख आणि आतिथ्यशील स्वभावाचे पुण्यातील नामवंत सेवानिवृत्त शिक्षण तज्ञ. एम. ए. एम. एड पर्यंतचे शिक्षण, गेली कित्येक वर्षापासून सातत्याने आध्यात्मिक विषयावर लेखन, रामदास, टेंब्येस्वामी, गोंदवलेकर महाराज, साईनाथ इ. सहा संत चरित्रे प्रकाशित शिवाय बाबांची तीन तासात वाचून होईल अशी छोटी पोथी प्रसिद्ध, जयश्री प्रकाशन ही स्वतःची प्रकाशन संस्था, वाचन, लेखन, मनन, चिंतन यात सदैव दंग. )

या, पाहा भक्तजन ! निघे कशी पालखी
श्रीगुरु बैसले आत, जशी मूर्त की !--॥ धृ० ॥
गुरु यतिवर योगी, त्यांसी दीनोद्धार
आधार अनाथा, आर्तास्तव संचार
कुणि हाक मारिली, "धावा देवा ! या ना"
पुरविण्या आस ती, आले, नच वंचना !—१
प्रभु स्वये दिगंबर, करुणेसी ना थांग
नेसले पितांबर, हे तर श्रीगौरांग
शिरि चमके झगमग, किरीट, मौक्तिक-तुरा
का पुष्पहारानी झाला गंधित वारा !—२
त्या पाहा मखमली गाद्या-गिरद्या भवती
भरजरी कलाबतु, गोंडे प्रेमे डुलती
ही छत्रचामरे, सूर्य-चंद्र भरजरी
दरवळे कस्तुरी, फिरता चवरी वरी !—३
किती प्रेमे गाती, गीते—करुणाष्टके
आर्तता विव्हलता, गाता वाणी थके
किती गायन—वादन, "धावा देवा ! आता"
भारले श्रीगुरु, मायच ही तत्त्वता !—४
या निकटी आता, निरखा मुखमंडळ
संतोष मुखावर, उमले जैसे कमळ
तो पाहा उचलिला हस्त, भास ना, कृपा
अर्पिले हृदयचि, फळ ये ऐसे तपा !—५

—श्री. र. श्री. पुजारी
रमा-निवास ९९२ सदाशिव, पुणे–३०

# सत्वरी धाव तू आता !



[ डॉ. विनायक गो. दुर्गे, 'दुर्गेश' एम. ए. एच. एम. डी. एस. साहित्यरत्न, नागपूरचे प्रथितयश कवी व चिंतनशील लेखक, 'साहित्य विहार' चे कार्यवाह, मराठी, हिंदी, संस्कृतमधून लेखन. विविध विषयावर १४-१५ पुस्तके प्रकाशित. अध्यात्मिक प्रवृत्तीचे कवी म्हणून प्रसिद्ध. महाराष्ट्र शासनाकडून पुरस्कार. दरवर्षी यांचेतर्फे मराठीतील उत्कृष्ट काव्यसंग्रहास ५०१ रु. चे डॉ. कवी दुर्गेश पारितोषिक देण्यात येते. ]

साईनाथा ! सत्वरी धाव तू आता !! ॥ धृ० ॥

नाही केले कधी तिर्थाटन
श्रवण न केले हरिचे किर्तन ।
कधी न केले प्रभु-गुण गायन ।
हरण्या दुरिता । सत्वरी धाव तू आता !! ॥ १ ॥

दैन्य, संकटे, व्यथा, वेदना ।
कष्टविती नित मजला दीना ।
जडू न देई भक्ति-भावना ।
चंचल चित्ता । सत्वरी धाव तू आता !! ॥ २ ॥

क्षणभंगुर हे मानव-जीवन ।
सुटे न तरिहि माझे " मी पण " ।
देण्या सत्वर अपुले दर्शन ।
मजसम पतिता । सत्वरी धाव तू आता !! ॥ ३ ॥

– डॉ. विनायक गो. दुर्गे, 'दुर्गेश'
'सौजन्य', धर्मपेठ विस्तार, नागपूर १०

# स्वप्नामधल्या ऋषीवत पुरुषा

[ डॉ. उमेश ल. केळकर, साईभक्त, रत्नागिरी येथील मेंटल हॉस्पीटलमध्ये वैद्यकीय अधिकारी. ]

स्वप्नामधल्या ऋषीवत् पुरुषा, शोध तुझा मी घेतो ॥ ध्रृ. ॥

वाट चालूनी थकूनी थबकलो
अर्ध्या मार्गी पाठी फिरलो
स्वस्थ मनाने दूर पहातो
मार्ग बिचारा सपाट दिसतो ॥ १ ॥

मधून पाणी चमकून उटले
दुष्कृत्यांच्या खळग्यामधले
मनात माझ्या झोका देते
सत्कृत्यांची चढणच नसते ॥ २ ॥

वणवण फिरूनी शिर्डी येतो
दर्शन साईंचे मी घेतो
चरणी अश्रूंचा अभिषेक वर्षूनी
मायेच्या पदरात विसावतो ॥ ३ ॥

सत्‌चित्‌रूप ते हृदयी वसोनी
जीवन माझे कृतार्थ करतो
करुणामय ते ध्यान स्मरोनी
पैल्तीराची वाट पाहतो ॥ ४ ॥

– डॉ. उमेश केळकर
विठ्ठलकृपा, १६०३ एम. जी. रोड,
रत्नागिरी

# साईलीलेची आज आली साठी

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆



[डॉ. सुमती ल. खानविलकर या लोणावळ्याच्या प्रसिद्ध कवयित्री आहेत. अध्यात्मिक व चिंतनशील विषयावर त्याच विषयाला वाहिलेल्या मासिकातून सातत्याने लेखन. बाबांवर अढळ निष्ठा ठेवून रोग्यांवर इलाज-उपचार सारे जीवन साई सेवेलाच वाहून घेतले आहे.

श्रीसाईलीलेची आज आली साठी
अनुभवाची घेऊनी चालतसे काठी ॥ १ ॥
काठी कशी म्हणू हा आहे बाबांचा सोटा
अनुभवांचा भरलासे घरोघरी साठा ॥ २ ॥
वाचूनी साईलीला मन येतसे गहिवरून
एकमेकांचे वाचून अनुभव भक्त जाती रमून ॥ ३ ॥
काय वर्णू साई लीलांची किर्ती
नास्तीकांच्याही पुढे उभी राही साई मूर्ती ॥ ४ ॥
नसे घेणे नसे देणे साईलीलेतील अनुभव वाचणे।
साईलीलेची किती वर्णू किर्ती
कितीकाना मिळाली असे स्फूर्ती ॥ ५ ॥
लिहिता गाता साई महती
सामोरी उभीच राहे साई मूर्ती ॥ ६ ॥
बाबांच्याकडे येणे म्हणजे येणे
सुमन म्हणे वेडेवाकुडे साईचे गुण गाणे ॥ ७ ॥

—डॉ. सुमति खानविलकर
सीताकुंज, लोणावळा (पश्चिम)

# साईंची आरती

[ डॉ. आर. एस. कापडी श्री साईबाबांचे अनेकदा दर्शन सौख्य घेतलेले पुण्यवान भक्त. कोल्हापूरचे नामवंत डॉक्टर. बाबांनी पाठीवरून हात फिरवून यांना शुभाशिष प्रदान केले आहेत. हयातीत बाबांच्यावर लेखन, काव्य तसेच काही नाटकांची पुस्तकेही प्रसिद्ध. मुले पण डॉक्टर आहेत.]

आनंदे, आनंदे, आनंदे गावू
पंचारती ओवाळा ॥ धृ० ॥
साईचरणी भक्तिभावे सुमने ही उधळू ॥ १ ॥

विश्व स्वधर्मी, गोफ गुंफुनी
गिरक्या हो घेऊ।
साईनामाच्या टिपऱ्या मारित
शिरडीला जाऊ ॥ २ ॥ आनंदे

अद्वैताचा ताल धरुनी
आनंदे बागडू।
साई आमुचा धर्म प्रणेता
अवनीवर दुडदुडू ॥ ३ ॥

द्वैत रगडुनि जात्याखाली
समानतेचे पीठ दळू।
साईकृपेने षडरिपुची कणिक चांगला मळू ॥ ४ ॥
पंचारती ओवाळू ॥

—डॉ. आर. एस. कापडी
साईप्रसाद, राजारामपुरी १३ वी गल्ली
कोल्हापूर

# श्री बाबांचे आमंत्रण

44



[ डॉ. सौ. मालती राहाटे, भंडारा येथील सरकारी रुग्णालयातील डॉक्टर. बाबांच्यावर भक्ती आणि निष्ठा ठेऊन लेखन तसेच रोग्यांवर पण उपचार व इलाज. आपल्याकडे येणाऱ्या रोग्यांना आराम वाटावा म्हणून साईनामस्मरणाचा महिमा प्रसंगी सांगतात. ]

श्री बाबांचे आमंत्रण मला, " मुली तू येई माहेराला "।
दो दिवसांचे कवि-संमेलन ।
भावंडांचे होईल मिलन ॥
भावंडांचे कौतुक करण्या मुली तू येई माहेराला ॥ १ ॥
सुखसोईंच्या भक्तनिवासातून । मंदिर परिसरपाही निरखून॥
भक्तिभाव बघण्या मुली, तू येई माहेराला ॥ २ ॥
साई प्रसादी तुला भरविल। प्रेमे पूर्णामाता ॥
माहेरी उणे न काही तुला मुली, तू येई माहेराला ॥ ३ ॥
मम नाताला आण बरोबर ।
लेंडीबागे तिला दाखव मोर ॥
तुझ्या स्वागता गुलमोहर फुलला ।
मुली, तू येई माहेराला ॥ ४ ॥
समाधि मंदिरी आपण बसू या ।
सुख दुःखाच्या गोष्टी करू या ॥
मार्ग प्रीतीचा दावू सकला मुली, तू येई माहेराला ॥ ५ ॥
श्रद्धा-सबुरी तुझ्याच बहिणी स्वागत करते शिरडी राणी ॥
मीही उत्सुक भेटण्या तुला
मुली, तू येई माहेराला ॥ ६ ॥

— डॉ. सौ. मालती राहाटे
सामान्य रुग्णालय, भंडारा

# साई कृपा

[ डॉ. ग. स. कामत, पुण्यातील नामांकीत डॉक्टर बाबांचे अनेक वर्षे भक्त असल्यामुळे बाबांवरच भक्तीरसपूर्ण काव्यांचे लेखन, चिंतन, मनन ]

। न कळे ते कळो येईल या जीवा ।
। स्मरे साई नामे एका चिया ।
। न दिसे ते दिसो येईल या मनी ।
। स्मरे साई नामे एका चिया ।
। न बोले ते बोले येईल अंतःकरणी ।
। स्मरे साई नामे एका चिया ।
। न भेटे तो भेटे निजस्वरुपे ।
। करिता चिंतन एका साई नाथा ।
। अलभ्य तो लाभ होईल तो अनंत ।
। नाम निरंतर साई स्मरतां ।
। जीव हा आसक्त केला सर्व भावे ।
। साई चरणी आता मनोमनी ।

—डॉ. ग. स. कामत
११९४।१३ शिवाजीनगर
पुणे ४११००५

# भाऊबीज



[ डॉ. कु. इंदूताई नाईक–लोणावळ्याच्या प्रसिद्ध डॉक्टर, तेथील मुक्ता नर्सिंग होम हे स्वतःचे रुग्णालय. तिथे जातीने देखरेख व रुग्णसेवा व त्या जोडीलाच श्रीबाबांची पण तन-मनाने सेवा. पुणे-सातारा मार्गावर असलेल्या दत्तात्रय इंडस्ट्रिजच्या मॅनेजिंग डायरेक्टर. श्रीबाबांवर भक्तीभावानेच सातत्याने लेखन. ]

माझी न मी राहिले,
साईबाबा सदनी पाहिले ॥
गेला दसरा, गेली दिवाळी,
वाटे डोळे बिज शुभदिनी,
मम बंधु घरी आले ॥ माझी ॥

पाट मांडोनी घाली रांगोळी,
पानामध्ये पुरण पोळी,
बाबा माझे जेऊ बैसले ॥ माझी ॥

गुढ्या तोरणे दारा पुढती,
चौरंगावरी बाबा बैसती,
भाऊराया मी ओवाळीते ॥ माझी ॥

—डॉ. इंदू नाईक
मुक्ता नर्सिंग होम, सीताकुंज
मुंबई-पुणे रस्ता, लोनावळा ( पश्चिम )

# साई के दरबार

[ डॉ. वसंतराव दिवाकर पात्रीकर 'पयोधर' या टोपण नावाने बिलासपूर मध्यप्रदेशात परिचित, मातृभाषा मराठी पण हिंदीतून शिक्षण यामुळे प्रामुख्याने हिंदीतून काव्यरचना. बिलासपूर येथे डॉक्टरी व्यवसाय. होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशन ऑफ इंडियाचे सदस्य. ]

गुरुजी मोरी बाधा हरो अब,
चरनन सीस नवाई ॥ टेक ॥
काम क्रोध अरू मद-मत्सर में,
जग डुबा है रे भाई ।
काल गति को कोऊ न जाने,
छिन छिन लोभ जनाई ॥ १ ॥
चरनन...
लागीं ठेस जगत भया ठाडा,
समय रहे न जगाई ।
यह मेरा वह तेरा कहके,
माया मोह जगाई ॥ २ ॥ चरनन...
साईं के दरबार में पहुँचा,
दिये हाथ पसराई ।
पयोधर असुँवन धार बही जब,
गुरु पुलकित गले लगाई ॥ ३ ॥
चरनन...

—डॉ. वसंत दिवाकर पात्रीकर 'पयोधर'
रोडी मार्ग, गली नं. ३ टिळकनगर
बिलासपूर, ( मध्य प्रदेश )

# साठ वर्षे जाहली साईलीलेला





[ सौ. तारा चेंदवणकर श्री साईलीलाचे कार्यकारी संपादक सदानंद चेंदवणकर यांच्या पत्नी. मराठीतून अध्यात्मिक साहित्य वाचनाची भारी आवड. एकाकाळी मुंबापुरीतील विविध नामांकीत इस्पितळातून रोग्यांची सेवा-सुश्रुषा करण्याची नोकरी. श्रीबाबांच्यावर लहानपणा पासूनच अढळ निष्ठा म्हणूनच की काय बाबांनी यांना भयंकर आजारातून पण जीवदान दिले. ]

साठ वर्षे जाहली साई माते
साईलीला स्वल्प गद्य गीते ॥
अल्प मोलात जाय दूर देशी
देश गर्जूनीही जाय परदेशी ॥
शिरडी वृत्तांत घरोघरी देई
साईबाबांचा प्रचार कार्य करी ॥
भाव भोळे भक्त तिचे गरीब थोर
हृदय उमाळूनी लेख गीत लिहित ॥
किती ज्ञानी पंडीत तसे अल्प साक्षर
शिरी त्यांच्या बाबांचे दोन्ही कर ॥
प्रती वर्षी शिर्डीत स्नेह प्रदर्शिती
रिसिव्हर काकरे गोड स्वागतही देती ॥
सह भोजनाचा काय तो आनंद
साईबाबाही समाधीत होती तृप्त ॥
साईलीला ही अमर राहो जगती
नाथ साई ही गर्जो अवनी वरती ॥
साईनाथा लेकरा द्यावो सदा स्फूर्ती
गद्य गीत स्फूरो हेच तुम्हा प्रार्थी ॥

**—सौ. तारा चेंदवणकर**
राधामाधव, चेंबूर

# भक्तांची पुकार

[ श्री. महाले–एम. एस.सी पर्यंत उच्च शिक्षण, मध्य प्रदेशातील बैतुल येथील ज. ह. शासकीय महाविद्यालयातील गणिताचे प्राध्यापक–बाबांवर नितांत श्रद्धा ठेऊन इंग्रजी मराठीतून गद्य पद्य लेखन. ]

यावे रे साई मन गेले कंटाळून ।
रात्र–दिवस तुझे ध्यान, मला तुझ्यावाचून कोण ।
यावे रे साई मन गेले कंटाळून ॥ १ ॥

हाक मारिता मारिता गेलो मी थकून ।
निभव तुझे वचन हाक हाकेला देईन ।
यावे रे साई मन गेले कंटाळून ॥ २ ॥

तुझे ध्यान येता दुःख जाई विसरून ।
ह्या युगात ध्यायला साई नाम द्यायला अन्नदान ॥
यावे रे साई मन गेले कंटाळून ॥ ३ ॥

कसा तू पावशील हे न येई ध्यान ।
तूचि दावी मार्ग होईल दूर अज्ञान ॥
यावे रे साई मन गेले कंटाळून ॥ ४ ॥

– प्रो. एच. बी. महाले,
अध्यक्ष, गणित विभाग
ज. ह. शासकीय महाविद्यालय, बैतूल, म. प्र.

# भूपाळी श्रीसाईबाबांची



श्री. रमाकांत नागेश पंडित, मूळ सावंतवाडीचे. आयुर्विमा विभागात टंक लेखक पदावरून सेवानिवृत्त. वय ६९ वर्षे. विविध सेवेबद्दल मुंबईच्या महापौरांचे हस्ते सत्कार. मांगल्याची ज्योत हे काव्य पुस्तक प्रकाशित. रामरक्षा, दासबोध, रामायण, गणपती अथर्वशिर्ष, श्रीसाईसच्चरित, स्तोत्रे, अभंग, गुरुचरित्र इ. धार्मिक ग्रंथ चांगल्या कागदावर स्वहस्ते सुवाच्य लिहून ते पत्ररूपाने यंदा जाने. १९८२ मध्ये संमेलनात बाबांना अर्पण. या पत्राची लांबी दिड मैल असून त्यात सव्वा लाख शब्द आहेत. संतवाङ्मयावर भरपूर लेखन.

उठा उठा हो साईनाथा प्रभो दीन दयाळा
उठी लवकरी साई सूर्य उदयाचली आला
श्रीसाई मेघःश्यामा रजनीनाथ अस्तास गेला
रवि किरणानी दाही दिशा पहा उजळल्या
अरुणोदय होता पक्षी गेले विहार करण्याला
सडा संमार्जन करूनी नारी काढती रांगोळ्या
द्वारी उभे तुझे गोपाळ हाका मारिती तुला
उठिया साई उठी पुरुषोत्तमा उशिर झाला
पंचारती घेऊनी ललना ओवाळती तुला
शिरडी साईमंदिरी तुझा भक्तगण आला
निरंतर ध्यातो हृदयी तुझी नाममाळा
उठा उठा हो साईनाथा प्रभो दीनदयाळा

**—श्री. रमाकांत पंडित**
प्रभास्मृती, भाऊदाजी मार्ग
माटुंगा मुंबई १९

# माहेरघरचा सोहाळा

(परम साई भक्त ह. भ. प. लक्ष्मण गणेश उर्फ काकासाहेब महाजनींच्या सुकन्या, साईबाबांचे त्यांनी जवळून प्रत्यक्ष दर्शन घेतले म्हणूनच की काय साईलीला ७ व्या लेखक–कवी संमेलनाच्या अध्यक्षा, लेखन व काव्याची आवड. सध्या वास्तव्य इंदूर.

शिर्डी माझे माहेरघर
साई दर्शनाचे द्वार ॥
माझे बाप आणि आई
शिर्डीचे ते बाबासाई ॥
प्रेमे मज पाचारूनी
साईलीला संमेलनी ॥
माझे बंधू आणि भगिनी
भेटवीले संमेलनी ॥
मोह बहू झाला मनी
तया सर्वांना पाहोनी ॥
आशिर्वाद बाबा ध्यावा
नित्य घडो तुमची सेवा ॥

—सौ. प्रभाताई मुळये
सरस्वती सदन, ६ नाथमंदिर कॉलनी,
साऊथ तुकोगंज, इंदूर–१

## श्री साईलीला लेखक–कवींनो लक्ष द्या

● श्री साईलीलेकडे पाठवावयाचा कोणताही मजकूर संपादक श्रीसाईलीला ८०४ बी साईनिकेतन, डॉ. आंबेडकर पथ, दादर मुंबई ४०००१४ याच पत्यावर पाठवा.


● श्री साईलीलाकडे पाठवावयाचा कोणताही मजकूर कृपया कागदाच्या एकाच बाजूने लिहा. पोस्टकार्ड किंवा इनलंड लेटर (आंतरदेशीय पत्र) यावर मजकूर लिहून तो अजिबात पाठवू नकात.

● लेखक–कवींनी आपल्या मजकुराबरोबर ३५ पैशाचे तिकीट लावावे म्हणजे त्यांना त्वरीत पोच पाठविता येणे शक्य होईल किंवा लिखाण नापसंत असल्यास ते परत पांठविणे सहज सुलभ जाईल.

● पुढील सूचना मिळेपर्यंत भक्तांनी कविता मुळीच पाठवू नयेत.

# ॥ साई उदी घेता मुखी ॥

48



(श्री. प्रभाकर कोळमकर मुंबई महापालिकेतील शिक्षण खात्यात नोकरी साहित्याची व सांस्कृतिक कार्य करण्याची आवड अभंग गीतांची एक कॅसेटही अलिकडेच प्रकाशित)

साई उदी घेता मुखी जळून जाती शरीर व्याधी ॥ १ ॥
साई उदी स्पर्शे अंगी जन्म होई धन्य जगी ॥ २ ॥
साई नाम येता ओठी पाप पळे पुण्य गाठी ॥ ३ ॥
साई देव ऐसा जगी श्रेष्ठ जीव भावे घरी ॥ ४ ॥
साईमय श्वास घेती भव पैल तीरी जाती ॥ ५ ॥
साई नाम जो उच्चारी उद्धरला तो या जगी ॥ ६ ॥
साई नाम जपे मनी त्याला बाधे न करणी ॥७ ॥
साई देव ऐसा जगी जागो जागी उभा राही ॥ ८ ॥
बाबा साई क्षणो क्षणी उभा राही भक्तापाठी ॥ ९ ॥

—श्री. प्र. गो. कोळमकर
बी. ए. बी. एड. एलएल बी.
गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली ( पूर्व )

# ॥ श्री साईभक्ति ॥


[ सौ. संपदा नारगोळकर–श्रीसाईबाबांच्या लहानपणापासून भक्त असून बाबांच्या बद्दलची भक्ती काव्यरूपाने प्रगट करतात. ]

शिर्डी तुझे रूप न्यारे
पालटले श्री साईनाथाने
दाही दिशांतूनी भक्त गणांचा येतसे लोंढा
शिर्डी शिर्डी एकच मनी असे त्यांच्या तोंडा
हपापले मन भक्तांचे
घ्यावया दर्शन श्री साईंचे
भक्त येऊनी रमती या रम्य शिर्डीत
श्री साईनाथांच्या समाधी मंदिरात
सर्व मुखी एकच नामाचा जप
श्री सद्गुरु साईनाथ महाराज

**—सौ. संपदा नारगोळकर**
११।९१ उन्नत नगर नं. ३ म. गां. रोड
गोरेगाव मुंबई ६२

× × ×

# आणि झाली साठ वर्षाची आज श्रीसाईलीला



[ श्री. डी. बी. पोतनीस व सौ. प्रमोदिनी पोतनीस ही दोघेही साईभक्त आहेत. दोघेही लिहितात अगदी उमाळ्यानं. विशेषतः कविता करण्याचा व त्या म्हणून दाखविण्याचा त्यांना जणू छंदच आहे. ]

( चाल – पुष्पांजली ही )

वाट पाहते आमुची आई शिरडी गावाला
येतील म्हणते माझी बाळे मला भेटण्याला
आम्ही बालके समोर दिसता आनंद वाटे तिला
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला १
तहान भूकेने व्याकुळलेली असतील दमलेली
तशीच म्हणते घ्या बाळांनो भाकर झोळीतली
किती काळजी या बाळांची साईमाऊलीला
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला २
धूळभेट होताच आईची नयने पाणावती
घट्ट मिठी पडते बाळांची साईचरणांभोवती
किमया ही तर ‘ साईलीला ’ची आमुच्या भेटीला
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला ३
अष्टम लेखक-कवी संमेलन योग घडून आला
हृदय हृदयांचे बंधुभगिनींचे मिलन होण्याला
हे तर आमुचे निमित्त कारण दावी साईलीला
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला ४
आई आमुची सत्कार करते बाळाबाळांचा
सत्कार कसला हा तर प्रसाद भक्ती प्रेमाचा
पुनरुपी भेटू आशिष देते करावया सोहळा
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला ५
साई समाधीवरील पाकळयांचा सुगंध हा सुटला
साई भक्तीचा मळा फुलोनी आनंद हा लुटला
डोंगर माथी कडी कपारी आवाज एक उठला
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला ६
साईनाथांची गोड वाणी तशीच ही लेखणी
पोतनीस म्हणे घ्यावी सेवा साई तव चरणीं
कोटी कोटी प्रणाम आमुचे श्रीसाईलीला
आणि झाली साठ वर्षांची आज श्रीसाईलीला ७

–श्री. बी. बी. पोतनीस
२६/७ एच. बी. पिंपरी पुणे १७

# ॥ मनोहर ध्यान तुझे साई ॥




[ सौ. अस्मिता दांडेकर, मालेगावच्या कवयित्री सौ. सुशिलाबाई हजारे यांच्या कन्यका. बी. ए. बी. एड. पर्यंतचे शिक्षण सुखी संसारी जीवनात राहून श्रीसाईकाव्य लेखनात समाधान. ]

मनोहर ध्यान तुझे साई ।
हरपुन मम देहभान जाई ॥ धृ० १
शिरडीला मी जवजव आले ।
पाऊल माझे मंदिरी खिळले ।
अश्रुधार ही अविरत चाले ।
उमाळा कसा अनावर होई ॥ १ ॥
टाळ विणा अन् मृदुंग वाजे ।
आरतीचा हा नादची गर्जे ।
सिंहासनी तव रूप विराजे ।
भव दुःखाचा विसरची होई ॥ २ ॥
थकली माझी माता पितरे ।
तव चरणाची आस तया रे ।
एकवार तरी दर्शन दे रे ।
धाव हे ओढाळ मन घेई ॥ ३ ॥

—सौ. अस्मिता कमळाकर दांडेकर
बी. ए. बी. एड

# साई सृष्टीची कविता

(हायको काव्य)



[ श्री. जगदीश देवपुरकर-हसऱ्या व्यक्तीमत्वाचे धुळयाचे एक तरुण पत्रकार. विविध विषयावर धुळे परीसरातील नियतकालीकातून प्रासंगिक विषयावर लेखन. गाण्याची आवड. बाबांवर लावणी, गझल, रुबाया, पदे, गीते यांचे अखंड लेखन, उत्कृष्ट वक्तृत्वशैली, समाज प्रिय कार्यकर्ते. ]

● आयुष्यभर अमृतासारखे
ते गोड जगणे
कडुलिंबालाही अमृतमय करून गेले–

● निधर्मी दुनियेचा एकच एक राजा
अवेळी, जळी स्थळी कोठेही विचारा
रोम रोम गरजेल " नाथ साई माझा "

● श्वासाश्वासातून जाते
नाव आता साई, सुत सुमनेंदु सांगे
" तीच माझी द्वारकामाई "

● आहे माय माझे ' शिर्डी माहेर '
बिन तेलाने मिळे दिव्याला
प्रितीचा आहेर–

● कसे व्हती सारे संमेलना गोळा
माझा साई लावी साऱ्यांना प्रेमाचा ळळा
समाधी मंदिरात मग फुलतो हा मळा

—श्री. जगदीश देवपूरकर
४०९८ देवपूर, नेहरूनगर धुळे ४२४००२

# सार्थक

[सौ. उषाताई मुळे – शिरडीच्या श्रीसाईनाथ विद्यालयातील हिंदी विषयाच्या अध्यापिका, मराठीतून गद्य व पद्य यावर श्रीबाबांवर भरपूर लेखन. कन्या कु. संजिवनी मुळे पुण्याला डॉक्टर, आपल्या आईप्रमाणेच ती पण बाबांवर लेखनाचा यत्न करते.]

मी धन्य, धन्य झाले।
साईचे चरण मला दिसले ॥ १ ॥
मूर्ति साजिरी आणि गोजिरी।
संदेश देत हा श्रद्धा सबूरी ॥ २ ॥
जीवनाचे सार्थक अजी झाले।
बाबांच्या चरणाशी आले ॥ ३ ॥
इथेच होती शांती मुक्ती।
दिव्यत्वाची आणि प्रचिती ॥ ४ ॥
वरदानाचे अमोल बोल मिळाले।
साईंचे चरण मला दिसले ॥ ५ ॥

**– सौ. उषा प्रभाकर मुळे**
साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी

# श्री साई पुजा


[ श्री. नरसिंहराजा देशपांडे–बिदर आंध्र प्रदेशातील येल्लारेडीचे एक वयोवृद्ध साईभक्त. वय सुमारे ७० चे वर पण या वयातही बाबांवर काव्यलेखनाची भारी आवड. संपूर्ण दिवस भक्ती व परमेश्वर चिंतनात घालवितात. ]

मनोभावे पुजा करा साईनाथा
आम्हा संकटी पावसी नाम घेता ॥ धृ० ॥

तुझ्या दर्शने मी झालो पवित्र पवित्र
तुझ्या भक्तीने मी झालो सुनीत सुनीत
किती वर्णू लीला तुझी साईनाथा ॥ १ ॥ मनो.
आम्हा संकटी पावसी नाम घेता ॥ धृ० ॥
तुझ्या भक्तीचा वर्णू मी काय महिमा
अनुभवास येता कळे सर्व तुम्हा
अनुभवोनी सांगे राजा साईनाथा ॥ २ ॥ मनो.
आम्हा संकटी पावसी नाम घेता ॥ धृ० ॥
तुझ्या चरणाचे दास आम्ही आहो सर्व
सर्वा संकटी रक्षुनी हरी सर्व गर्व
निरंतर ऐसी कृपा ठेवी, साईनाथा ॥ ३ ॥ मनो.
आम्हा संकटी पावसी नाम घेता ॥ धृ० ॥

– श्री. नरसिंहराजा देशपांडे
मु. पो. बिदर ता. येल्लारेडी
जि. निजामाबाद ( आंध्रप्रदेश )

# दर्शन दे साई



सौ. शशिकला रेवणकर, अंबरनाथ, मूळ कारवारच्या पण सध्या महाराष्ट्रात स्थायिक महाराष्ट्रातील बहुतेक सर्व श्रद्धास्थानी तीर्थाटन. उत्तम प्रकारची काव्यरचना करण्यात सिद्ध हस्त. भाऊकतेने गातात व गाता गाता त्यांचा कंठही दाटून येतो.

कुठे शोधु हे साई तुला, आसरा नाही या जगती मला
जिव व्याकुळ झाला, तुझ्या दर्शनाला
हे साई जवळ घे मला, हे बाबा जवळ घ्या मला ॥ १ ॥
साई, साई, साई पुकारू किती
तुझ्या या भक्तांची सरली मती
माया ममता ही लावली मला
धन दौलत ही मिळाली मला
मुले बाळे ही दिली मला
पण बाबा तुम्हीच दिसेना मला
हे साई जवळ घे मला, हे बाबा जवळ घ्या मला ॥ २ ॥
साई तुझ्या दर्शना विना
ना मिळे मोक्ष जना
आम्ही आलो तुझीया दारा
दे तुच आम्हा थारा
तुझ्या दर्शनाची साई आम्हा लागली घाई
तुझी ही शशी, झाली वेडीपिशी
तरी हे साई दर्शन दे मला
हे साई जवळ घे मला, हे बाबा जवळ घ्या मला ॥ ३ ॥

—सौ. शशिकला रामकृष्ण रेवणकर
बालाजीनगर कुंटोली, अंबरनाथ

# चला जाऊ शिरडीला

[ श्री. व्ही. एस. आकेरकर – कोकणात आकेरकर गुरुजी या नावाने परिचित. विद्यादानासारखे परमपवित्र कार्य. सध्या सेवानिवृत्त. बाबांच्यावर अमाप भक्ती व काव्य पंक्तीतून ती ओसंडते. ]

[ चाल–रघुपति राघव राजाराम ]

चला जाऊ या शिरडीला
प्रभू साईच्या भेटीला ।। धृ. ।।
दर्शन घेऊ साईचे
फेडू पारणे डोळ्यांचे
करू या सार्थक काहीतरी
आलो मानव जन्माला ।। १ ।। चला जाऊ या...
परम कृपाळू साईनाथ
संकटी भक्ता देई हात
भक्ती भावे साईच्या
शरण जाऊ या चरणाला ।। २ ।। चला जाऊ या...
दिवे जाळीले पाण्याने
अडले ना मुळी तेलाने
चमत्कार हा दावुनिया
क्षणी नमविले दुष्टाला ।। ३ ।। चला जाऊ या ...
हांक ऐकता भक्तांची
सन्निध मूर्ति साईची
अणू रेणूतहि बघु जाता
साई पुरेपूर भरलेला ।। ४ ।। चला जाऊ या...

–श्री. आकेरकर व्ही. एस.
साई निवास, मु. पो. पाट, ता. कुडाळ,
जि. रत्नागिरी

# याद ऊना साई

[ सौ. लीलाताई मराठे-धुळ्याच्या एक समाजकार्यकर्त्या. बाबांवरची प्रगाढ भक्ती, श्रीमती बहिणाबाईच्या अहिराणी भाषेतून बाबांवर काव्यरचना करणाऱ्या पहिल्या कवयित्री. मंजुळ आवाजात आपली गीते सादर पण करतात. ]

रांधता रांधता, याद ऊना साई
शिरडीना जत्रे, चाल म्हणे साई ॥
संरावन भादा, पानी व वरसे
शिरडीना वाटे, मेघूराज गर्जे ॥

उठता बसता, याद ऊना साई
काम ते धंदान, माले ध्यान नही ॥
आशीन कार्तिक, पीक जवारीन
सोनाना तोटाले, कनीस मोतीन ॥


चालता चालता, याद ऊना साई
घरधनी बोले, वाट कोन्ही जोई ॥
ऊनाज दसरा, वर्नाज दिवामी
मन्हाव साईले, आरती ववायी ॥

बलावा बलावा, साईले बलावा
तीरथ पायन, मस्तकले लावा ॥
लीला म्हने माय, काय सांगू तुले
बीजनी कोरती, उगे आभायले ॥

तीन्हा परकास, मन्हाव दारमा
श्रद्धा सबुरीना, बोलव घरमा ॥

—सौ. लीला डी. मराठे,
काठी बंगला, साक्री रोड, धुळे

# नाव पुरेसे साईचे



(श्री. विजय हजारे, एम. ए. पर्यंत शिक्षण, ए. सी. सी. कंपनीत नोकरी आपल्या कृपाशू प्रकाशनातर्फे श्रीसाईगीतदरबार हा श्रीसाईलीलेच्या ४८ कवी कवयत्रींचा प्रातिनिधिक साईगीत संग्रह प्रकाशित केला. साईकृपा हा बाबांच्या विषयावर १९८१ साली दिवाळी अंक प्रकाशित. बाबा हे आराध्य दैवत, अनेक कथा, कविता विविध नियतकालीकातून प्रसिद्ध. लेखनाची भारी हौस. कॅसेटस मधूनही गीते प्रकाशित)

तरुनी जाया हा भवसागर
नाव पुरेसे साईचे
भावभक्तीने मनात स्मरता
भय नुरे कलीकाळाचे
सत्य मानुनी नित्य आचरता
वचने अमुच्या "बाबां" ची
पदोपदी मग ये अनुभवा
प्रचिती 'साई' प्रसादांची
करीता इच्छा, हृदयांतरी
'दिव्यरूप' ते प्रत्यक्ष दिसे
विविध रूपानी अपुल्या दारी
द्याया दर्शन अवतरसे
एक मंत्र ह्या कलीयुगींचा
"साई–साई" हाच असे
भवपाश सुटाया सुखदुःखाचा
याहूनी दुजा मार्ग नसे

—श्री. **विजय द. हजारे** एम. ए.
सी/६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड
**बोरीवली पूर्व मुं. नं. ४००,०६६**

# दीनबंधु दीनानाथ




[ सौ. चंद्राबेन भाटे. मुंबापुरीतील प्रसिद्ध डॉक्टर विठ्ठलदास भाटे यांच्या पत्नी बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण. बाबांच्या भक्त. दरवर्षी दिवाळी बाबांच्या सहवासात घालवितात. वाचन, गायन, लेखनाची अत्यंत आवड. ]

दीनबंधु दीनानाथ मेरी दोरी तेरे हाथ
सद्‌गुरूबाबा साईनाथ मेरी दोरी तेरे हाथ
मेरी दोरी तेरे हाथ मेरी दोरी तेरे हाथ ॥
जय जोगेश्वर दत्त दयाळ
पतित पावन दीनदयाळ मेरी...
अनाथों के तू ही नाथ
राजाओं के तू महाराज मेरी...
गोविंद गोपाल तू घनश्याम
सद्‌गुरूबाबा साईनाथ मेरी...
किसी का ना करना मोहताज
माँगू तुझसे यही बात मेरी...
नमस्कार मेरा महाराज
जयकार तेरी दिन और रात मेरी...
भक्तन की तुम राखो लाज
सब भक्तन की पुरो आस मेरी...
सुन लो चंदु की यह बात
सुन लो भक्तों की यह बात मेरी...

**– सौ. चंद्राबेन भाटे**

रफी अहमद किडवाई मार्ग, वडाळा, मुं. नं. ३१

# वळख साईभक्ताची



[ श्री. अनिल केशवराव रसाळ, बी. पी. टी. मध्ये नोकरी. बाबांचे उपासक व बाबांवरच प्रामुख्याने लेखन. इंग्रजी व मराठीतूत वक्तृत्वाची आवड. आंतर विद्यालयीन इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत इंडो-अमेरिकन सोसायटीची तीन पारितोषिके व तीन रौप्यचषक विजेते. ]

वळख वळख: माझ्या मी पणाची
कशाला हवी माझ्या गुरुभक्ता १
माझी आई साई आणि बाप बाबा
त्याची ही कृपा म्हणती अनि २
साईरसे भरला उस हा डोंगा
रसाळ झालो अंगो अंगा ३
साई चित्ती त्याने वृत्ति ही रंगली
तेणे झाली माती माझ्या मी पणाची ४
होता मीची माती झाली राधाकृष्ण भेट
तेणे मज जाहले साई कृष्ण ज्ञान ५
साईकृष्ण माझा देई ज्ञानेश्वरा हात
तेणे होई ज्ञान मुखोदगता ६
आता माझे हे गाऱ्हाणे साईच्याद्वारी
त्याने तरी आता ज्ञाना अनुभव द्यावा ७
अमृताच्या डोही करी मला आता दंग
आणि मला कर मूर्तिमंत साई आनंद ८

**—श्री. अनिल केशवराळ रसाळ**
**बी. पी. टी. क्वॉर्टर्स, रेनॉल्डस रोड,**
**वडाळा मुंबई**

# तू वाहशी भार




(सौ. शकुंतला जगतकर बी. ए. पर्यंत शिक्षण, हिंदीचेही चांगले ज्ञान. लेखन, चित्र कला, खेळ, संगीताची आवड गांधर्व महाविद्यालयाच्या पदवीधर, साई साहित्याची आवड व त्यावरच बहुतांशाने लेखन)

साई, तव गळ्यांतील पुष्पहार देतसे दिव्यत्त्वाचा साक्षात्कार
त्या फुलांतून तू ऐकसी असंख्य मानवाचे हृद्गत
टिपून घेशी तू हलकेच त्यांतील दुःख भार
फुलांसवेच होतात हलके प्रत्येक मानवाचे अंतःकरण
साई, तव दर्शनात तृप्त होतात मनोगत
अशक्य तिथे तू मार्ग दाविसी नको तिथे तू बांध घालीसी
ये हा अनुभव क्षणोक्षणी म्हणूनच विश्वाच्या कोपऱ्यांतूनी
ये मानव धावूनी पुण्यं शिर्डी संस्थानी
साई, तू वाहशी भार जगाच्या सुखदुःखाचा
फुलांतूनी, आपल्या समाधीवर जैसे कृष्णाने उचंबळला गिरी
आपुल्या करांगुळीवरी, द्वापारयुगी तैसेच येऊनी शिर्डी क्षेत्री
दत्तरुपे अवतार घेऊनी उद्धरशी तू सकळासी कलीयुगी

—सौ. शकुंतला शंकर जगतकर
१९/१६२ उन्नतनगर विभाग
मु. पो. गोरेगाव (पश्चिम) मुं. ४०००६२

# साई क्रांति मचाने आया।

55



[ प्रा. गुंडेराव पटवारी–बिदर आंध्र-प्रदेशातील एन. एफ. जे. कॉलेजात हिंदीचे प्राध्यापक. साहित्यरत्न शिक्षा विशारद. काशी हिंदु विश्वविद्यालयाचे विद्यार्थी आणि उर्दू, फारसी व मराठीतून लेखन, श्रीबाबांवरच काव्य पण कोणत्याही विषया-वर क्षणभरात शेर किंवा काव्य करण्यात सिद्धहस्त. अत्यंत साधी रहाणी, नम्रता व ऋजूता हे गुण घेण्यासारखे आहेत. ]

साई भारत को आदर्श बताने आया
जन जन को सन्मार्ग बताने आया
हम सब भक्तों को श्रद्धावान बनाने आया
सकल जनों का हृदय मिलाने को आया
साई क्रांति मचाने आया १

सुख शांती का मार्ग दिखाकर
जन सन्मुख, धन को तुच्छ बताकर
दान, धर्म, श्रद्धा, सबुरी से हमें जगाकर
आया साई जिस से बच गयी अपनी काया
साई क्रांति मचाने आया २

साई आया जिससे बनी रही मर्यादा
बचगयी भक्ति-मिटा नहीं जीवन सादा
बलहिन, विवश, हीन दीन का मतवाला
प्रेम, दया, शांती का करनेको बोलबाला
साई क्रांति मचाने आया ३

शिरडीमेंही ईश्वरता लेकर आया
इसी भूमी को स्वर्ग बनाने आया
मन का, भक्ति वैभव प्राप्त कराने आया
जन मन का भय मिटाने आया
साई क्रांति मचाने आया ४

—**प्रा. गुंडेराव पटवारी** 'साहित्य रत्न'
एन्. एफ. जे. कॉलेज बिदर

# गोदा काठी



[ श्रीमती लीलाताई गुजराथी शिरडीत कायम निवास म्हणून भाग्यवान. बाबांच्या भक्त असल्याने समाधी मंदिर व चावडीतून गायन भजनासाठी नित्य हजेरी. बाबांच्यावर काव्यलेखन व गाण्याची आवड ]

गोदा काठी शिरडी ग्रामी
साईनाथ प्रगटले
देखिली साईंची पाऊले
पाहिली बाबांची पाऊले । धृ० ।
प्रभात काली मंगल समयी
शंख नाद ऐकिले
भक्त हे दर्शनासी पातले, । १ ।
ओवाळून हे पंचारतीला
नयनी देखूनी सगुण मूर्तीला
आशिर्वाद इच्छिले । २ ।
अल्ला मालिक भला करेगा
श्रवणी ऐकूनी अनाहूत ध्वनीला
देहभान हरपले देखिली साईंची पाऊले
पाहिली बाबांची पाऊले । ३ ।

—**लीलावती गुजराथी** शिर्डी.

# साई स्मरण

[ श्री. ग. रा. पाल्कर–श्रीसाईबाबांवर उत्कृष्ट गीत रचना. अलिकडे साईस्तूती नामक कॅसेटसमधूनही यांची साईगीते प्रकाशित झाली आहेत. ]

तुझे नाम घ्यावे मुखी साईनाथा
अंतरी स्मरावी तुझी भाव गाथा धृ०

कृपाळू अनंता समाधिस्थ होशी
परि हाक देता धावूनिया येशी
कर जोडोनिया नमवितो माथा १

द्वेष-क्रोध सारे कथा मी पणाची
वाढविती बारे व्यथा जीवनाची
सारे लोप होती साई आठविता २

—श्री. ग. रा. पालकर
२२३/२, दारुवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला मुंबई नं. ७०

**श्रीसाईलीला**

**६१ व्या वर्षाचा पहिला अंक**

**रामनवमीस थाटात प्रकाशित होणार**

श्रीसाईलीला मासिकास चैत्र शके १९०४ माहे एप्रिल १९८२ रोजी साठवर्षे पूर्ण होऊन ते एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. यानिमित्ताने नववर्षारंभ अंकात भारतातील थोरा मोठ्या श्रीसाईभक्तांचे श्रीबाबांच्या विषयींचे अनुभव, विशेष लेख, आठवणी, ज्येष्ठांचे शुभसंदेश इत्यादी भरपूर वाचनीय मजकूर देण्यात येईल.

या खास अंकासाठी कुणाही भक्ताने आपले साहित्य पाठवू नये.

# उदी माहिमा



[ श्री शहाणे–डोंबिवलीच्या कवयित्री, साईलीलेतून गेली २५ वर्षे नित्यनियमाने लेखन. दत्त सांप्रदायिक वाङ्मयाची आवड व त्याचेच वाचन. साईसत्‌चरित्राची अनेकदा पारायणे. ]

रमते राम आयोजी उदिया की गोनी लायोजी
हे साईचे पद आवडते उदी देताना नित्य गायचे
धुनी साईनी प्रदिप्त केली उदीच्या गोणी लाख प्रसवली
लाख जनाला आयुष्याचे वरदानच देऊन गेली
वेड तिने कितीकांचे गेले रोगापासून मुक्तत्त्व केले
कितीकांचे आणि मनोरथ याच उदीने पूर्ण केले
अशी उदी ही भाळी लावता काळाचीहि न चले सत्ता
शिवशंभूच्या भस्मासमजणू प्रतिक उदीही आम्हा गमली
जारे सारे शिरडीस जारे उदीच्या गोणी घेऊन यारे
भावभक्तिने सांजसकाळी भाळी आपुल्या उदी लावा रे
साईंच्या त्या धुनीमधूनी उदी रुपे ही न्या संजिवनी
उदी वाचुनि कधी न रिकामी अक्षय धुनी ही उदी प्रसविणी

—श्रीमती श्री शहाणे
लक्ष्मी निवास गडकरी मार्ग डोंबिवली

# करता साईचा गजर

[ श्री. सूर्यकांत गर्जे पुण्याचे साईभक्त श्रीबाबांवर गद्य व पद्य लेखन, सौ. सरला गर्जे व सर्व मुले यांची पण बाबांवर नितांत श्रद्धा व त्यांचेही बाबांवर लेखन श्रीसाईदास मंडळ शिवाजीनगर या संस्थेचे क्रियाशील कार्यकर्ते, मराठी हिंदी व इंग्रजीतूनही वक्तव्य करतात. ]

करता साईचा गजर
दुःख त्वरित जाते जळून
होता साईची नजर
दैन्य सत्वर जाते गळून
करता साईचा गजर
सौख्य येते येते भरून
होता साईची नजर
पीडा जाते जाते सोडून
करता साईचा गजर
पाणी वाहते दुथडी भरून
होता साईची नजर
पीक डुले शेतामधून
करता साईचा गजर
लक्ष्मी सत्वर येते धावून
होता साईची नजर
शत्रू जातो दूर पळून
करता साईचा गजर
शांती नांदे घरांमधून
होता साईची नजर
करता साईचा गजर
भक्ति ओसंडते भरून
प्रकाश दाटे जीवनामधून

—श्री. सूर्यकांत ना. गर्जे
८० शिवाजी नगर पुणे ५

# गुरुस्थान

[ कु. शशिकला साळगावकर–सोलापूरच्या कवयित्रीं श्री बाबांच्यावर लहानपणापासूनच निस्सीम प्रेम. त्यांच्यावर काव्यरचना. स्वतःच्या नावावर दोनचार काव्यसंग्रह प्रकाशित. नाजूक हळूवार काव्य रचना हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य. मुलांसाठी लेखन करण्याचा यत्न. ]

निंबतळी गुरूस्थान वसे
दर्शन घेता गुरूभाव ठसे
सतत जळता धूप कोंदला
भक्तीभावे साई वंदिला...

भक्त कोण गुरू कुणा ठावे
गुरूभक्त दोन्ही एक स्मरावे
श्रद्धा उपजली ज्या ज्या मनी
साईकृपावर त्याच क्षणी...

पावन शिर्डी क्षेत्री जावे
मोक्ष पुण्य सहज घ्यावे
जेथे फिरले पाय प्रभूचे
ती धूळ माथी छत्र साईचे...

साईस्पर्शे किमया घडली
कडुलिंबाची कटूता सुटली
तुझीया पदी मी शरण साई
अपराधी जीवन मधूर होई !

—कु. शशिकला साळगावकर
नवीपेठ, सोलापूर


# साईची लेकरे

( श्री. र. शं. जुन्नरकर–नामवंत मराठी चित्रपट दिग्दर्शक. मा. विनायकांचे सहवासात राहून भरपूर कार्यानुभव. अनेक माहितीपट व अनुबोधपट तसेच चित्रपट दिग्दर्शित, उत्कृष्ट कवी व गद्य लेखक. श्री साईबाबा व श्री उपासनी महाराजांचे परमभक्त, 'मशिदीत प्रगटला परमेश्वर' ही साईबाबांवर बहारदार व संग्राह्य मराठी कादंबरी, 'दि मिशन डिव्हाइन' ही बाबांवर लिहिलेली जगातील पहिली मराठी कादंबरी प्रकाशित. याच कादंबरीचे हिंदी व कानडीतून अनुवाद नजिकच्या काळात प्रकाशित होत आहेत. )

साई साई हाक मारता
देते हात आई
आईची ती माया, साई
तुजवीण कोण देई ?
तुझी लेकरे आम्ही म्हणुनि
आम्ही सारे भाई
जाण याची आहे आम्हा
तरीही एकी नाही !
भिंत द्वयाची बांधुनि जो तो
वेगवेगळा राही
देह वेगळे, मने वेगळी
परि आत्मा वेगळा नाही !
धाव पावरे साई रामा
जुळव एकीची नाती
पुन्हा पुन्हा तू अवतारूनि
आण घडवुनि एकी !

—श्री. र. शं. जुन्नरकर
५ वसंत अपार्ट मेंटस ४७ कस्तूर पार्क,
शिंपोली मार्ग, मु. पो. बोरीवली मुं. ९२

# ....आणि झाली साठ वर्षांची श्रीसाईलीला




(श्री. नागेशराव मोगलाईकर—खानदेशातील प्रसिद्ध कवी. बाबांवर गाढ श्रद्धा. धुळ्यातील हायकोर्टातून प्रामाणिकपणे नोकरी बजावून सेवानिवृत्त. सध्या ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक. धुळ्यातील प्रसिद्ध कार्यकर्ते व समाजसेवक.)

वर्षामागून वर्षे गेली गाता साईलीला
आणि झाली साठ वर्षांची 'श्रीसाईलीला' धृ०
भक्ति—मुक्तिप्रद भूवरचे एकच मंगल धाम
परम कृपालु श्रीसाईचे पवित्र शिरडी ग्राम
महिमा तयाचा उच्चरवाने सांगे जगताला १
जाता भेदरुन संसारीजन बघुनिया दुरिते
साई भक्तीचा वसा देऊनि अभय तया करिते
साई—उदीची प्रतीती घडवी व्याकुळ जनतेला २
विद्वानांना श्रीसाईचे सांगे गूढ ज्ञान
सामान्यांना श्रीबाबांचे सांगे सुलभ ज्ञान
अध्यात्मिक तसे भौतिक तत्वे विशद करी सकला ३
बाबांचे हे सान थोर की जमले भक्त गण
करिती साजरा षष्ठ्यब्दिचा मंगलकर हा सण
शिरोधार्य 'श्रीसाईलीला' असे नागेशाला ४

—श्री. नागेश मोगलाईकर धुळे
२८२०, 'नागलक्ष्मी,' घ. नं. ४
धुळे ४२४००१

# साईनामाचा गजर



[ श्री. रमेश चव्हाण–धुळ्याचे पत्रकार आणि कवी साईलीलेतूनच नव्हे तर खानदेशातील अनेक नियतकालीकातून लेखन. मुलांच्यासाठी काही पुस्तके पण प्रकाशित. सौ. कुसुमताई व चिरंजीव विजय ही पण लेखन करतात. ]

साईनामाचा गजर
घुमे कानात अजून...
भावभक्तीची आरती
गातो तल्लीन होऊन...
आठवतो आरतीची
भावमयी प्रसन्नता...
वाहे ओसंडुनि आणि
शुचिर्मय पावनता...
अशी साईची आरती
मंत्र वाद्यांचा गजर...
केव्हा कशी स्पर्शीयली
माझ्या हृदयीची तार...
शब्द लिपीतून उठे
साई अंतरीची ओढ...
माझे मला लागले रे
साईबाबा तुझे वेड...!

—श्री. **रमेश डी. चव्हाण** साईनिकेतन,
दुसरा मजला १९९ गुजरलेन, नवापूर मु. पो. ता. नवापूर जि. धुळे

# तवचरणी मज आश्रय द्यावा

[ श्री. राधाकृष्ण गुप्ता–मराठी व हिंदीतून आध्यात्मिक विषयावर गद्य व पद्य लेखन, श्रीसाईबाबा व त्यांचे समकालीन संत यांचेवर काव्यरचना, मुंबईतील जनरल पोस्ट कचेरीत नोकरी. श्रीसाईगीते कॅसेटसमधून प्रकाशित. ]

थकले डोळे साई देवा
झडकरी दर्शन मजला द्या धृ०

तुम्हा पाहता मी पण नुरले
भक्तीने हे अंतर फुलले
आता उशीर का रे व्हावा १

निराकार तो निर्गुण ईश्वर
शिर्डीत झाला तू साईश्वर
'सोऽहम्' जपता मोह सुटावा २

किती धरावी मी हो सबूरी ?
लवकर व्हावी इच्छा पूरी
अविरत करितो तुमचा धावा ३

तुम्हीच माझे माय माऊली
दया, कृपेची करा सावली
तव चरणी मज आश्रय द्यावा ४

—श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकरवाडा, भगतसिंग पथ
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ जि. ठाणे

60

# श्रीसाई कवन

[ सौ. शारदा वाकनीस संसाराच्या कामाच्या रगाड्यातून जरा जरी उसंत मिळाली की आपल्या साईभक्तीत रममाण होतात. बाबांवर काव्ये लिहितात व आपली काव्ये इतरांना समधुर आवाजात मनमोकळेपणाने गाऊनही दाखवितात. पती श्री. भालचंद्र पण पट्टीचे गाणारे असून कोणत्याही गीताना उत्कृष्ट चाली लावून रसाळपणे गातात. ]

त्रिपुरारी गंध लावुनी साई झाला शंकर
जैसा भाव तसा देव साई देई दर्शन

रामावरी ज्याची भक्ति त्यास देई रामपोथी
जसा भाव तैसा देव साई देई दर्शन

विठ्ठलावरी ज्याचे प्रेम छबी विकाया येती छान
जैसा भाव तैसा देव साई देई दर्शन

एका भक्ता मनी आले जावे तीर्थस्थानी
अंगुळीतूनी वाहे गंगेचे पाणी
जैसा भाव तैसा देव साई देई दर्शन

नाही भक्ती नाही प्रेम तरी द्यावे आम्हासी दर्शन
जैसा भाव तैसा देव साई देई दर्शन

**—सौ. शारदा भा. वाकनीस**
५५०, सेंट्रल गव्ह. कॉलनी
सायन कोळीवाडा मुंबई २२

# साई ही दिव्य ज्योत



( श्री. दत्तात्रय मोरे श्रीबाबांच्यावर अतिशय भावना विवश होऊन काव्य लेखन करणारे तसेच सुमधुर वाणीने गाणारे हे कवी पुण्यातील एक रिक्षा चालक आहेत. शिवाजीनगरच्या श्रीसाईदास मंडळाचे एक कार्यकर्ते. )

आहो पेटवा ही दिव्य ज्योत घरोघरी
आहो पेटवा ही दिव्य ज्योत घरोघरी　धृ०

किती सांगु तुम्हा कथा, नाही पुरणार जीवन गाथा
साई आहे आमचा दाता, हा खरोखरी　१ आहो

ज्याची भक्ती आहे फार, त्याला दावी चमत्कार
त्याचा महीमा अपार, कोण करील सांगा त्याची बरोबरी　२ आहो

तो आहे फकीर, त्याला कशाची फिकीर
कधी कमी नाही पडणार, त्याच्याघरी　३ आहो

हि मानवाची जात, फिरे दिन आणी रात
परी मुक्ती मिळेना, त्याच्या विणा खरी　४ आहो

जो साई लीन झाला, कधी कमी नाही त्याला
असा आहे बोलबाला, या पृथ्वीवरी　५ आहो

शिरडीस लागतील ज्यांचे पाय, त्याचे टळतील अपाय
दत्तात्रय सांगे उपाय, तुम्हा खरोखरी　६ आहो

—श्री. दत्तात्रय महादेव मोरे
४७० शिवाजीनगर पुणे ५

# बाबांचा साक्षात्कार

[ सौ. वसुंधरा रामराव चोरे. लहानपणापासून साईभक्त. बाबांवर श्रद्धापूर्वक लेखन व काव्यरचना करतात.

एके दिवशी प्रभात समयी चमत्कार झाला
शिर्डी क्षेत्री प्रगटुनी बाबांनी साक्षात्कार केला १

जीवित असता बाबा नव्हती कोणासहि त्यांची कदर
कोणी म्हणे गोसावड्या तर कोणी म्हणे फकीर २

मशीद होती शेणाने ओली पाहुनी पठाणांनी केला आक्रांत
बाबांची किमया पाहुनी त्यांचा क्रोध झाला शांत ३

व्यापाऱ्यांनी तेल देण्याचे नाकारता लोकांचा झाला कोप
तेलाअभावी पणत्यात नीर घालुनी बाबांनी लाविले लक्षदीप ४

संकट समयी पामर होतो निराश
अशावेळी धुनीतील उदी येते कामास ५

लेंडी बागेतील पाणी पिवुनी भक्तांची भागते तहान
अशा ह्या सत्पुरुषांच्या लीला महान ६


न ठावे कोणासहि बाबांचा जात धर्म
भक्तांना सन्मार्गी लावणे हे एकच त्यांचे कार्य ७

बाबा आले कोठुन गेले कुठे हे न कोणासी ठावे
सर्वांमुखी नाव त्यांचे देव रुपाने अजरामर झाले ८

शुभदिनी दसऱ्यास बाबा झाले समाधिस्थ
त्यांच्या चरणी लीन होऊनी मी राहिन एकनिष्ठ ९

—सौ. वसुंधरा रामराव चोरे
८०३, सी. डॉ. आंबेडकर रोड, दादर
मुंबई ४०००१४

# जाऊ शिरडीला



(श्री. दामोदर रघुनाथ दळवी– मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये डॉक्स खात्यात ऑफिस सुपरिटेंडेटच्या हुद्यावर. नियत-कालीकातून लेखन व काव्य प्रसिद्ध. कोकणातील अनेक संस्थातून समाज कार्य, कोकण दर्शनचे काही काळ सह-संपादक, भवानीमाता व श्रीसाई जीवन काव्यसंग्रह प्रकाशित.)

साई आई, शिरडीची ही, भक्तां बोलविते
हाक तीची ती येता कानी, अधीर मन होते
साई आई भेटुनी येऊ, चला माहेराला
चला चला ग, जाऊ चला ग, जाऊ शिरडीला १

स्वप्नी येऊनी हळूच कानी, आई कशी म्हणते
"बहु लोटले दिस ग बाळे, सय तुझी येते"
प्रेमाश्रूनी डोळे झरती झरझर वहायला
चला चला ग, जाऊ चला ग, जाऊ शिरडीला २

साई आई साईबाबा साई दैवतांते
शिरडी येता साई भेटता, चरणी मन रमते
साई चरणी, माहेराला पवित्र होण्याला
चला चला ग, जाऊ चला ग, जाऊ शिरडीला ३

घेऊ दर्शन शरण जाऊ या, साई चरणाते
शक्ति मिळते भक्तांना भवसागर तरण्याते
साई मंदिरी प्रेमे जाऊ, साई पूजायला
चला चला ग, जाऊ चला ग, जाऊ शिरडीला ४

श्रद्धा सबुरी पुरी ठेऊनी, साई चरणाते
संसाराची सारी चिंता हरुनिया जाते
बळ लाभते तरुनी जाण्या, भवसागराला
चला चला ग, जाऊ चला ग, जाऊ शिरडीला ५

श्रीसाई तू माझे आई, पायी मी नमिते
साई साई समर्थ साई साईनाम जपते
माहेराला शिरडी क्षेत्री, कल्पद्रुम भू ला
चला चला ग, जाऊ चला ग, जाऊ शिरडीला ६

—श्री. दा. र. दळवी
५/७८ बी. पी. कॉलनी,
रेनॉल्डस रोड, वडाळा मुंबई ३७

## संत माझा कबीरसाई

संत माझा कबीरसाई
दत्त माझा साईनाथ बाई धृ०
वेष भोळा भाव भोळा
शिळी बैसला शिरडी ठायी – १ –
गुरु माऊली डुलते भजनी
झरते पाणी नयनी-हृदयी – २ –
असोत तुझे रे कर ते दोन्ही
डोई माझ्या कृपामाई – ३ –

— सौ. संपदा अजित पावसकर
ब्लॉक नं. जे. १८/२ स. गो. बर्वेनगर,
घाटकोपर–मुं. नं. ४०००८४

# साई तुझे मंदिरी आलो

(श्री. रा. मा. आडकर–सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथले श्रीबाबांचे एक जुने भक्त. गेली अनेक वर्षे श्री साईलीलेतून बाबांवर काव्य धारा वाहात आहेत.)

साई तुझे मंदिरी आलो मी धावून
कर ठेवी मस्तकी होऊन मी पावन
अहंकाराचा धूप टाकीला अग्नीत
श्री दत्त साई अंतरी रे न्याहळीत १
ओंकाराचा स्वर ऐकतो दरबारी
साईनाथ वसले मम हृदयांतरी
भक्त राहूनी उभा पाहिरे श्रीहरी
ठाव देरे बाबा तुझ्या चरणावरी २
पवित्र ती उदी मी लावली ललाटी
पाव तू श्रीहरी अंती भेटी
मस्तकी शोभतो मुगूट किती छान
भर जरी मेखला अंगी हिरवी पान ३

—**श्री. रा. मा. आडकर**, २४०५ साईकृपा, बार्शी

●


[ सौ. सिंधु कृष्णराव सणस. श्रीबाबांच्या काटोलच्या एक कवयित्री. ]

# साईनाथ माझा

साईनाथ माझा ज्ञानाचा सागर
भक्तीचा आगर साईनाथ माझा
भक्तांची माऊली सुखाची साऊली
शिर्डी विसावली भक्तांसाठी धृ०
जगाच्या कल्याणा झिजविली काया
शिणविली काया परोपकारा धृ०
ऐशा योगीयाचे वंदू या चरण
होऊ या पावन स्मरुनिया त्यासी धृ०

—**सौ. सिंधु कृष्णराव सणस**
गळनाका, मु. पो. काटोल, जि. नागपूर

# मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर



( श्री. गजानन देवीदास कुलकर्णी, शिक्षण बी. ए. पर्यंत उस्मानाबाद येथे शासकीय सेवेत विविध नियतकालीकातून नित्य लेखन )

प्रिती प्रभूची झाली हो साकार
निराकार प्रभू होवूनिया साकार
आमुच्यासाठी घेवुनिया अवतार
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर

सांगा काय कुणाला नाही दिधले ?
काय कुणाला वाटे न तो देणार !
श्रद्धा सबुरी ठेवा देण्या तत्पर
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर

जातपात ना एकच धर्म आधार
भक्तालागी सदैव दे आधार
निराकार प्रभु होवूनिया साकार
मशिदीत प्रगटला साई जगदिश्वर

—श्री. ग. दे. कुलकर्णी
'कुलदीप' तांबरी, उस्मानाबाद


# सख्या हरि साईराया

[ सौ. उषाताई प्रभाकर अधिकारी, रत्नागिरीच्या साईभक्त कवयित्री, विद्या दानासारखे परम पवित्र सेवाकार्य, शिक्षिका असल्याने लेखन, वाचन व वक्तृत्वाची आवड. विशेषतः पद्यलेखनात श्रीबाबांच्या विषयीची भाव भक्ती तर गद्य लेखनातून कथा गुंफून बाबांचा अनुभव वा शिकवण ध्वनीत करतात. आपल्या सर्व कन्यकानाही पदवीधर करून त्यांनाही साईभक्तीचे पाठ देतात. ]

अवनी अवघी उद्धराया
अवतरलासी शिरडी ग्रामी
धन्य केली भरतभूमी
तेलावीण दीप तेवविले
अपुले सामर्थ्य दाविले
नजर पडता व्याधीवर
त्या पळाल्या दूरवर
निसर्गावर मात केली
आगी वादळे शमविली
भक्ती लाविले कित्येकास
मोक्ष दिधला त्या सर्वांस
अनेक दावुनी अपुल्या लीला
जनसमुदाय भुलविला
ऐसा साई चिंतामणी
जणु नवरत्नांची खाणी

—सौ. उषा अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी

# ध्यानी मनी स्वप्नी पाहू



(श्री. बी. व्ही. उर्फ नानासाहेब लांजेकर, साईभक्त चित्रकार आणि गायक, तबला पेटी इ. वाद्येपण उत्तमपैकी वाजविता येतात. बाबांवर कविता करण्याची आवड. पुण्यातील सुदर्शन केमिकल कंपनीत नोकरीस.)

(चाल : एक रूप होऊ सगळे, आशा भोसले)

ध्यानी मनी स्वप्नी पाहू
साई रूप निर्गुण पाहू
साई नाम वदनी राहो
पूर्ण ब्रह्म हृदयी राहो १
राम रूप नयनी राहो
शांती देई सकला साई
उदी दाने रक्षसी साई
नाम तुझे वदनी राहो
मूर्ती तुझी नयनी राहो २

—श्री. लांजेकर बी. व्ही. पुणे ९

# साईच ईश आहे

(श्री. एन. जी. परुळेकर बी. ए. आर. सी. तुर्भे येथे अधिकारी पदावरून सेवानिवृत्त झाल्यावर ह्यूम पाईप्स मध्ये नोकरी. त्याही नोकरीतून निवृत्त. सध्या आध्यात्मिक वाचन व लेखन करण्यात कालक्रमणा. गूढ गूंजनपर अध्यात्मिक विषयावर विचार लेखनातून नव काव्यातून प्रदर्शीत करतात.)

घडणार काय आहे, देवा तुलाच ठावे
जे जे असेल व्हावे, ते ते तसे घडावे
मज मात्र एक ठावे, तव नाम नित्य ध्यावे
आणि तुलाच देवा, मी रोज आठवावे १

अज्ञान मूळ आहे, चिंतेत व्यर्थ राहे
सामर्थ्य नामी आहे, कोणास हे कळावे
शब्दास अर्थ जोहे, भक्तास देव तोहे
भक्तीच साध्य आहे, साध्यास भक्ती नोहे २

पवनास स्पर्श आहे, सुमनांत गंध वाहे
देवेश त्यांत आहे, कळले कुणास का ते
हृदयात जो विराजे, तव भार तोचि वाहे
शिणलास व्यर्थ बाहे, सुमनांत देव आहे ३

चक्षूस गम्य नोहे, हृदयात ब्रह्म राहे
सुमनांत जे स्मरावे, नयनीच ते दिसावे
जे जे जसे पहावे, ते ते तसे दिसावे
बिंदूत सिंधु आहे, हृदयातुनी पहावे ४

मूर्तीत देव पाहे, देवास मूर्ती नोहे
कोणास होय ठावे, साईत ईश आहे
दीनात साई पाहे, देवेश त्यास भासे
त्यालाच होय ठावे, साईच ईश आहे ५

—श्री. एन. जी. परुळेकर
केदार १७३ अभिनवनगर बोरीवली
(पश्चिम) मुंबई ६

# साई समर्थ



सौ. कलावती चव्हाण– श्रीसाईबाबांवर हमेशा काव्यलेखन, कीर्तने करण्यात तरबेज. अखिल भारतीय कीर्तन संस्थेची 'कीर्तनालंकार' पदवी प्राप्त. ]

धाव रे धाव साईमुरारी
तुज वाचोनी कोण मज तारी
ह्या भव संसार सागरी
धन योगे मान सन्मान ह्या जगती
असती जवळ त्या योगे
नाती गोती सगे सोयरे भवती
निश्चकांचन होता ह्या जगती
दुरावले बंधु आणि भगिनी
मायेचे बंध तुटता सगे सोयरे दूर लोटती
तुझ्या प्रीतीविण जोडू कशी
साई माझा प्राण सखा
साईच माझा मायबाप सर्वथा
तुझ्या कृपेची पाखर आता
साई समर्था साई समर्था साई समर्था

–सौ. कलावती वसंतराव चव्हाण
अंबाबाई मिस्त्री निवास रु. नं. ६
सेनापती बापट मार्ग, मुं. नं. २८

# बाबाचा अभंग

(श्री. शंकरराव गोल्तकर–ताईचे साईबाबा या नावाने प्रसिद्ध असलेल्या लीलाताई गोलतकर यांचे वडील, साईप्रेमी, गाण्याची व काव्याची आवड.)

पतित पावन नाम तुझे देवा
आलो तुझ्या द्वारा साईनाथा धृ०
नाम तुझे गोड रुप मनोहर
लागले ते वेड तुझे देवा १
जन्मो जन्मी देवा घडो तुझी सेवा
हीच आस मनी आहे देवा २
शिरडीच्या नाथा कृपा करी दासा
विनवितो कर जोडोनीया ३
दास म्हणे देवा लोभ असो द्यावा
तुजवीण कोणी नाही देवा ४

—**श्री. शंकरराव गणेश गोलतकर** परळ व्हिलेज, परळ

# साई भेटी मी अधीर

(साई भक्त कवी व लेखक.)

काय वर्णावा साईचा प्रताप
साई नामाने मिटे चिंता, भवताप
घेता साईचे दर्शन
आनंदले तन, मन
मुख साईचे न्याहळीता
हात जोडूनि नमस्कार करिता
काळजी चिंता नष्ट होता
सहज टेकितो साईचरणी माथा
अवलोकिता साईचे नयन
भीती गेली सारी पळून
मना आला कसा धीर
साई भेटी का न होऊ मी अधीर ?

—**श्री. उज्ज्वल वामनराव कुळकर्णी**

# शिर्डीतील नेत्रशिबीर

—कु. रेखा दिघे

जाणा येथे आहे सहाय्य सर्वास ।
मागे जे जे ज्यास ते ते लाभे ।

अशा वचनांने, भक्तांना आपलेसे करून, त्यांना स्वतःशी एकरुप करणाऱ्या अशा श्री साईबाबांसारख्या महान विभूतीने सन १९१८ साली आपला देह ठेवला. तो दिवस होता विजया दशमीचा, दशमी सरून एकादशी सुरु झाली व श्री साईनाथांनी या जगातील आपले वास्तव्य संपवले. परंतु थोर विभूती या देहरुपाने जरी जगात वावरत नसल्या तरी त्यांचे कार्य सतत चालूच असते. श्री साईबाबा ही अशीच एक थोर विभूती होती हे सांगणे न लगे! श्रीसाईनाथांचे चरित्र हे अनेक चित्र-विचित्र लिलांनी भरलेले आहे. भक्तांना ते एखाद्या विचित्र परिस्थितींतून गोष्टीरुपाने उपदेश करून मार्ग दाखवत असत.

भक्तांची संकटे आपल्या अंगावर घेऊन स्वतः दुःख भोगून आपल्या खरोखरीच्या भक्ताला संकटमुक्त करीत असत. बाबा प्रथम वैद्यकी करीत असत, लोकांना औषधोपचार करीत असत.

श्री साईबाबांनी सन १९१८ साली देहत्याग केल्यानंतर त्यांचे कारकिर्दीत बांधल्या गेलेल्या इमारती व स्थावर जंगमाची व्यवस्था पहाण्याची जबाबदारी कोणीतरी स्विकारणे अत्यंत इष्ट होते. याकरिता सन १९२३ साली श्रीसाईबाबा संस्थान ट्रस्टची स्थापना झाली. संस्थानचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला. भक्तांची गर्दी आवरणे अशक्य होऊ लागले. अशावेळी सर्व बाजूंनी संस्थानची भरभराट करण्याची धडपड संस्थानचे अधिकारी करू लागले. यातूनच सन १९६४ साली ४८ कॉटस् असलेले आधुनिक साधनांनी उपयुक्त असे हॉस्पिटल बांधण्यात आले. श्रीसाईनाथ रुग्णालय हे सर्व आधुनिक साधन सामुग्रींनी सुसज्ज असे नगर जिल्ह्यातील नावारुपास आलेले हॉस्पिटल. त्यात भर पडली ती सन १९८१ मध्ये अंदाजे रु. २,००,०००/-ची अनेक आधुनिक उपकरणे परदेशांतून मागविण्यात संस्थान यशस्वी ठरले. त्यांत सिस्टोस्कोप, लॅप्रोस्कोप, व्हॅलिलॅब इ. उपकरणांचा समावेश आहे.

एकदा एका भक्ताचे डोळे सुजून लालबूंद झाले होते, दोन्ही डोळे सुजून बुबुळे रक्तबंबाळ झाली, अशा परिस्थितीत जगावे की मरावे असाच पेच माणसापुढे उभा राहतो. डोळे हाच माणसाचा अत्यंत नाजूक व तितकाच महत्वाचा अवयव. दृष्टीविना सारे जगच मुळी व्यर्थ व भकास. दृष्टी नाही तर जिणेच नाही अशी अवस्था होते. अशा या भक्तांसाठी कुणी वैद्य किंवा हकीम न मिळाल्याने अखेरीस लोकांनी

त्यास बाबांकडे आणले. बाबांनी दोन बिब्बे घेवून त्याचे गोळे करून ठेवले व स्वतःच्या हाताने दोन्ही डोळयात घातले व भोवती फडका गुंडाळून टाकला. सकाळी पट्टी काढून त्यावर पाण्याची धार धरली. पहाताच सूज सर्व ओसरलेली होती व बुबुळेही स्वच्छ झाली होती.

श्री साईनाथांनी भक्तांचे डोळे बिब्बे घालून बरे केले, हीच परंपरा राखण्यासाठीच जणू काही दरवर्षी संस्थानतर्फे नेत्रशिबीर आयोजित करण्यात येते की काय असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या नेत्रशिबिराचा लाभ गेली सतत ४ वर्षे अनेक लोक घेत आहेत. यंदाही या परंपरेत संस्थानने खंड पडू दिला नाही. उलटपक्षी गेल्या वर्षापेक्षा जास्तच रुग्णांनी या संधीचा लाभ घेतला.

यंदा हे शिबीर दि. २४–१२–८१ ते ३–१–८२ पर्यंत होते.

प्रथम दि. २४–१२–८१ रोजी एकूण १२५० रुग्णांची नांव नोंदणी करून घेण्यात आली. दि. २६–१२–८१ रोजी या रुग्णांची प्राथमिक तपासणी करून ज्यांचे ऑपरेशन करणे अत्यंत जरूर आहे, अशा ४७१ रुग्णांना दाखल करून घेण्यात आले, व बाकीच्या रुग्णांना औषधपाणी देऊन घरी पाठविण्यात आले.

दि. २७–१२–८१ व २८–१२–८१ हे दोन दिवस म्हणजे, दाखल करून घेण्यात आलेल्या ४७१ रुग्णांच्या आयुष्यातील मनाला हेलकावे देणारा क्षण. ऑपरेशन यशस्वी होण्यासाठी बाबांकडे करूणा भाकण्याचा क्षण, व पुर्नदृष्टी मिळविण्याचा क्षण. सर्व काही श्री साईनाथांचेवर भरवसा ठेऊन. या दोन दिवशी, ४७१ रुग्णांची मोतीबिंदूची ऑपरेशन्स करण्यात आली. या रुग्णांना बाबांच्या आशीर्वादाने दृष्टी देण्याचे कार्य खालील डॉक्टर्सनी केले.

१) डॉ. तेलंग—मुंबई
२) डॉ. शिवलकर—मुंबई
३) डॉ. तलवलकर—मुंबई
४) डॉ. सोनेकर—नगर
५) डॉ. तांबे—नगर
६) डॉ. देशमुख—मुंबई
७) डॉ. बिजूर—मुंबई
८) डॉ. आपटे—ऑनररी, श्रीसाइनाथ हॉस्पीटल शिर्डी.

हे नामवंत व नावाजलेले डॉक्टर्स आठ दिवस आपला व्यवसाय सोडून, कशाचीही अपेक्षा न करता इथे येतात व आपली साईचरणी या ऑपरेशन्सच्या रुपाने सेवा रुजू करून बाबांचे दरबारी हजेरी लावतात.

हे शिबीर लायन्स क्लब मुंबई, लायन्स क्लब कोपरगाव, रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉर ब्लाईंड मुंबई व साईबाबा संस्थान शिर्डी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आले होते.

रुग्णांना व त्यांचेकडील नातेवाईकांना राहण्यासाठी खास भव्य शामीयाना उभारण्यात आला होता. भोजनगृहातील मुले तसेच शाळेतील विद्यार्थी या रुग्णांची आपल्या आईवडिलांचे पेक्षाही जास्त आपुलकीने व आस्थेने सेवा करीत होती. तसेच राहाता प्राथमिक आरोग्य केन्द्राचे डॉ. गुंजाळ व त्यांचा कर्मचारी वर्ग, चासनळी प्राथमिक आरोग्य केन्द्राचे डॉ. क्षीरसागर व त्यांचे कर्मचारी, साईनाथ हॉस्पीटल शिर्डीचे डॉ. जोशी, डॉ. देशपांडे व त्यांचा कर्मचारी वर्ग, व श्री साईबाबा संस्थानचे पदाधिकारी, खाते प्रमुख इ. व्यक्तींनी या शिबिरासाठी जातीने लक्ष घालून शिबिर यशस्वी करण्यास जो हातभार लावला, त्याचे वर्णन करणेच कठीण आहे.

शिबिराचा समारोप मुंबई लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. मोहन लालवाणी यांचे अध्यक्षतेखाली दि. ३–१–८२ रोजी झाला. यावेळी निरनिराळया भक्तांची भाषणे झाली. तसेच आपणास पुर्नदृष्टी लाभल्यामुळे झालेला आनंद व्यक्त करताना काही रुग्णांना आपल्या भावना आवरणेच अशक्य झाले होते. त्यांचा आनंद द्विगुणीत झाला होता.

प्रत्येक रुग्णाला एक स्टीलचा ग्लास, काळा चष्मा, नंबराचे चष्मे व औषधाच्या बाटल्या मोफत वाटण्यात आल्या.

या शिबिरात एकही ऑपरेशन अयशस्वी झाले नाही ही केवळ साईकृपाच नव्हे काय ? केवळ साईबाबांच्या कृपेमुळे हा चमत्कार घडू शकतो असे म्हणावे लागेल व नकळत बाबांच्या वचनाची आठवण होते.

नवसास माझी पावेल समाधि ।  
धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ।  
नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ।  
नित्य घ्या प्रचित अनुभवे ।

★